# राजहंस ग्रंथवेध

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी
'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

वर्ष : पंधरावे
डिसेंबर २०२३
अंक : बारावा
मूल्य १० रुपये
पृष्ठसंख्या ५६




गेली चाळीस वर्षे दिलीप माजगावकरांनी विविध नामवंतांशी केलेला
चिंतनशील व भावगर्भ पत्रसंवाद, त्यांची विस्तृत मुलाखत,
तसेच 'दिगमा' या चतुरस्र आणि लोभस व्यक्तिमत्त्वाला न्याहाळणारे
त्यांच्या सुहृदांचे लेख; माजगावकरांनी विविध प्रसंगी प्रकाशनासंबंधी,
साहित्यकृतींविषयी केलेल्या अनुभवसिद्ध व रसाळ भाषणांचे संकलन आणि
त्यांनी आंतरिक जिव्हाळ्याने रेखाटलेली अनेक सुहृदांची आशयसंपन्न व्यक्तिचित्रे...
हे सर्व अंतर्भूत असलेली दोन पुस्तके.





ही कथा आहे सत्तरीच्या दशकातील तरुणीची. ओढाळ तरुण वयात मोहाच्या एका धूसर क्षणी अपघातानं ती एक चूक करते. पण त्यापायी तिचं सारं आयुष्यच बदलून जातं. यातून सुटण्याचा मार्ग तिला गवसतो का? परतीची वाट सापडते का?

**डोईचा पदर आला खांद्यावरी...**
डॉ. छाया महाजन

ज्यांना शास्त्रीय संगीताची गोडी आहे, त्यांना या पुस्तकातून काहीतरी नवं सापडेल! ज्यांना शास्त्रीय संगीत कळत नाही, त्यांना त्याची गोडी निर्माण होईल! हे पुस्तक केवळ वाचण्याचं नाही, तर ऐकण्याचंही आहे. पुस्तकात दिलेले क्यूआर कोड स्कॅन करून वाचक विविध रागांचा आस्वाद घेऊ शकतात.

**शब्द सूर जपून ठेव...**
नेहा लिमये







संगीत जुने असो वा नवे, 'आपले' असो वा 'त्यांचे', शास्त्रीय-उपशास्त्रीय असो वा चित्रपटसंगीत.

नवी-जुनी गाणी ऐकताना त्यामधील उमजलेल्या बारकाव्यांची आस्वादकाच्या भूमिकेतून केलेली मांडणी म्हणजे हे पुस्तक.

**गाता रहे...**
सुहास किर्लोस्कर

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी 'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

*आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू ॥*
*शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोकां ॥*

**संत तुकाराम**

# राजहंस ग्रंथवेध

संपादक :
डॉ. सदानंद बोरसे

सल्लागार संपादक :
विनया खडपेकर

कार्यकारी संपादक :
आरती घारे

संपादन साहाय्य :
विनायक पणशीकर
नरेश सबजीवाले
शुभांगी देशपांडे
डॉ. उमेश करंबेळकर
पंकज क्षेमकल्याणी

अक्षरजुळणी :
यशोधन लोवलेकर

मुखपृष्ठ शीर्षकरचना :
बाबू उडुपी

मुखपृष्ठ-आतील मांडणी :
तृप्ती देशपांडे

वर्ष पंधरावे :
अंक बारावा
१५ डिसेंबर २०२३
मूल्य : ₹ १०/-

अनुक्रम :


- संपादकीय / ५
- राजहंसी ग्रंथसृष्टी
  *समांतर रंगभूमी : पल्याड-अल्याड*
  – मेधा सिधये / ९
- चित्र पाहीन आवडी : नितीन हडप / १७
- असे जन्मले पुस्तक!
  *भावनिक प्रथमोपचार घरच्याघरी*
  – डॉ. हमीद दाभोलकर / २१
- आठवणींच्या खिडकीतून
  *बाभूळबन - भावभावनांची आंदोलने*
  – माधव वझे / २५
- क...कवितेचा : शेखर जोशी / २९
- उद्गार
  *सोप्या, रंजक भाषेत विश्वाची ओळख*
  – सुनीत पोतनीस / ३१
- राजहंसी पार / ३७
- वाचकांच्या मनातलं... / ४५


या अंकातील लेखांमधील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.

पत्रव्यवहाराचा पत्ता : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. फोन - (०२०) २४४७३४५९/२४४६५०६३.
E-mail : rajhansgranthvedh@gmail.com ● Website : www.rajhansprakashan.com

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली ‘राजहंसी’ पुस्तके




त्यानं मातीतून रंग शोधले... शेंगदाणा-रताळ्यापासून चिकन-शाई-कॉफी-साबण-कागद बनवले... सोयाबीनपासून मोटारींसाठी सुटे भाग घडवले... असा हा मुलखावेगळा कार्व्हर या पुस्तकातून तुम्हांला भेटेल.

### किमयागार कार्व्हर

वीणा गवाणकर । चित्रे : माधुरी पुरंदरे

किंमत : ₹ १५०/- । (ट.ख. ₹ ४०)

‘एका दिशेचा शोध’ हे संदीप वासलेकरांचं पुस्तक इतकं गाजलं की, बारा वर्षांत निघाल्या चोवीस आवृत्त्या! सुधारून वाढवलेली, **रौप्यमहोत्सवी आवृत्ती!** यात अद्ययावत माहितीसह वाढवलीत तब्बल १२० पानं!

### एका दिशेचा शोध

संदीप वासलेकर

किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ४०)







आजच्या सामाजिक-राजकीय-आर्थिक परिस्थितीशी नानाविध ज्ञानशाखांच्या एकात्मिक अभ्यासाचा संबंध जोडत माणसाच्या व्यक्तिगत अन् सामूहिक वर्तनाचा वैज्ञानिक वेध घेणारे...

### माणूस ‘असा’ का वागतो?

अंजली चिपलकट्टी

किंमत : ₹ ५५०/- । (ट.ख. ₹ ४०)



# संपादकीय

*‘श्रीमद्‌भगवद्‌गीता’ या ग्रंथातील तत्त्वज्ञानाचा आणि तिच्यातील ‘विचार-विश्वा’चा सर्वांना परिचय करून देण्यासाठी ‘गीताधर्म मंडळ, पुणे’ ही संस्था गेली ९९ वर्षे अखंडपणे कार्य करीत आहे. त्या संस्थेची माहिती व तिचे कार्य यांबद्दल...*

नमस्कार वाचकहो,

बघता बघता २०२३ या वर्षाचा शेवटचा महिना आला आणि अंक तुमच्या हातात पडेल, तेव्हा तर वर्षाचे काहीच दिवस शिल्लक राहिलेले असतील. दर वर्षीप्रमाणे या वर्षी केलेल्या आणि खऱ्या अर्थी पूर्ण झालेल्या संकल्पांची यादी पाहिली जाईल आणि जे राहिले आहेत, असे संकल्प पुढच्या वर्षी नक्की करू, असे म्हणून बहुतांशी सर्व जण पुढे जातील. पण काही जण मात्र जे ठरवतात, ते नक्कीच तडीस नेतात आणि यशस्वीही करून दाखवतात. हे सर्व मुद्दाम सांगायचे कारण म्हणजे, ३ डिसेंबर २०२३ला ‘स. प. महाविद्यालय, पुणे’ येथे झालेला ‘गीतापाठ महायज्ञ’. पुण्यातील ‘गीताधर्म मंडळ’ या संस्थेने याचे आयोजन करण्याचा संकल्प वर्षाच्या सुरुवातीला केला आणि तो अतिशय उत्तमरीत्या पूर्णत्वास नेला. याचे वैशिष्ट्य असे की, यामध्ये दहा हजार सहाशे लोक प्रत्यक्ष सामील झाले होते, तर देशातील तसेच परदेशांतील पाच हजार लोक आंतरजालाच्या माध्यमातून सहभागी झाले होते. महाराष्ट्राच्या अनेक गावा-शहरांतील मंडळी स्वखर्चाने या महापाठात सहभागी होण्यासाठी आली होती. या महापाठाची नोंद ‘आशिया बुक ऑफ रेकॉर्ड’मध्ये झाली आणि त्याचे प्रमाणपत्रही त्याच दिवशी मंडळाला दिले गेले. अनेक वृत्तपत्रांनी याची दखल घेतली.

कुठलीही जाहिरात नाही, फलक नाहीत, की अवास्तव स्तोम नाही. महाराष्ट्रात जे गीतासंथा वर्ग चालतात, त्यांच्या साखळीतून सर्वांना निमंत्रण गेले होते. हल्ली १००० ते २०००चा समूह जमा करायला केवढा तरी पैसा, कष्ट आणि नियोजन करावे लागते. त्यासाठी अमुक रस्ता, तमुक चौक बंद ठेवले जातात, वाहतूक वेगळ्या मार्गांनी वळवण्यात येते. मात्र ३ तारखेला रविवार असूनही सर्व काही सुरळीत होते. कुठेही गडबड, गोंधळ नव्हता. सर्व आयोजन अतिशय व्यवस्थित होते. आयोजकांनी दहा हजार पाचशे खुर्च्यांची व्यवस्था केली होती, तीही अपुरी पडली.

मग आवाहन करताच ज्यांना जमिनीवर खाली बसता येते, अशा मंडळींनी आपल्या जागा प्रौढ व्यक्तींना उपलब्ध करून दिल्या, शंखनाद झाला आणि त्यानंतर 'गीतापाठ महायज्ञ' अतिशय प्रसन्न वातावरणात संपन्न झाला; म्हणून आज 'गीताधर्म मंडळ, पुणे' ही संस्था आणि तिचे कार्य, तसेच महत्त्वाच्या भारतीय ग्रंथाबद्दल म्हणजेच 'श्रीमद्भगवद्गीते'बद्दल लिहीत आहे.

भारतीय राष्ट्रवादाचे जनक लोकमान्य टिळक यांच्या 'गीतारहस्य' या ग्रंथातील 'ज्ञानयुक्त-भक्तिप्रवण कर्मयोगा'चा सर्वत्र प्रचार आणि प्रसार व्हावा, या उद्देशाने 'गीतावाचस्पती' प्रज्ञाचक्षु कै. सदाशिवशास्त्री भिडे आणि लोकमान्यांचे नातू पत्रकारमहर्षी कै. ग. वि. केतकर यांनी दि. २३ जुलै १९२४ या दिवशी म्हणजे लोकमान्यांच्या जयंतीच्या दिवशी 'गीताधर्म मंडळ, पुणे' या संस्थेची स्थापना केली. कै. भिडे यांनी इ. स. १९२४ ते १९४० या काळात संपूर्ण भारतभर दौरे करून गीताविषयक प्रवचने केली, तर कै. केतकर यांनी सातत्याने सहा दशके गीताप्रचार करतानाच भारतातील सर्व प्रमुख वृत्तपत्रांतून लेखन करून गीतेचे महत्त्व सर्वांसमोर अधोरेखित केले. आजमितीला भारतभर 'गीताजयंती' मार्गशीर्ष शुद्ध एकादशी या तिथीला साजरी केली जाते, याचे श्रेय 'गीताधर्म मंडळ, पुणे' या संस्थेला आहे.

१९५९ साली 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघा'चे पुण्याचे पहिले संघचालक विनायकराव आपटे मंडळाचे कार्यवाह झाले, त्यानंतर मंडळाचे कार्य विस्तारले. अनेक उत्साही कार्यकर्ते स्वेच्छेने मंडळात काम करू लागले. १९६७ साली विनायकरावांचे निधन झाले. त्यांना आदरांजली वाहण्यासाठी 'भावस्मरणिका' हा अंक प्रकाशित करण्यात आला. हा आजतागायत गेली ५६ वर्षे प्रकाशित होत असलेल्या 'गीतादर्शन' मासिकाचा पहिला अंक. मराठी मासिक इतकी वर्षे सलग चालवणे, हेही खरेच कौतुकास्पद आहे. गेली ३५ वर्षे इथे दररोज व्याख्यान व कीर्तन स्वरूपात ज्ञानसत्रही सुरू आहे. आता तर आंतरजालामुळे श्रोते दुरूनही हे कार्यक्रम पाहू व ऐकू शकतात.

१९७१ साली सदाशिव पेठेतील न्यायमूर्ती भिडे यांचा वाडा मंडळाने घेतला, तिथेच आज भव्य अशी 'गीताभवन' ही वास्तू उभी आहे. आज या भवनात १६०० चौ. फुटांची तीन सभागृहे आणि ४००० चौ. फुटांचे प्रांगण सभागृह आहे. १९९३ साली 'गीतासंथा वर्ग' सुरू झाला. यामध्ये गीतेचे शास्त्रशुद्ध उच्चारण शिकवले जाते. यासाठी सुमारे दीडशेपेक्षा अधिक वर्ग चालविले जातात. कोरोनाच्या काळात त्यात ऑनलाइन वर्गांचीही भर पडली आणि केवळ पुण्यातीलच नाही; तर ठाणे, कल्याण, नाशिक, नगर इ. ठिकाणचे, तसेच परदेशांतील गीताप्रेमी या वर्गांचा लाभ घेत आहेत. तसेच अनेक शाळांमध्येही गीतेतील अध्याय शिकवण्यासाठी आठवड्यातील ठरावीक दिवशी संथावर्गाचे शिक्षक जातात. हे सर्व नि:शुल्क शिकवले जाते. प्रत्येक वर्गासाठी गीताप्रेमींच्या संख्येनुसार २ ते ५ शिक्षक काम करत असतात.

‘गीताधर्म मंडळा’चे ग्रंथालय शासन मान्यताप्राप्त आहे. तेथे पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक अशी अनेक विषयांवरची पुस्तके आहेत आणि त्यासाठी सभासदांना अतिशय कमी वार्षिक वर्गणी आकारली जाते. मंडळाचा प्रकाशन विभागही आहे, त्याद्वारे आतापर्यंत असंख्य पुस्तके प्रकाशित झाली आहेत. केवळ पठण नाही, तर तो ग्रंथ अभ्यासावा, या दृष्टीने ‘गीतातत्त्वव्रती’, ‘ज्ञानेश्वरी प्रबोध’, ‘श्री तुकाराम गाथा’ या परीक्षा पत्राद्वारे घेतल्या जातात. जास्तीत जास्त लोकांनी यामध्ये सहभागी व्हावे, हा यामागचा उद्देश आहे. २०२०पासून ‘टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे’च्या विद्यमाने ‘गीतारहस्य पदविका’ हा अभ्यासक्रम सुरू झाला आहे. त्यालाही चांगला प्रतिसाद मिळत आहे.

‘श्रीमद्‌भगवद्‌गीता’ हा असा अध्यात्म-ग्रंथ आहे; ज्याचे तत्त्वज्ञान, त्यातील ‘वैदिक आणि विश्वात्म भाव’ आज संपूर्ण मानवजातीला उपयुक्त आणि अनुकरणीय असा आहे. जनमानसामध्ये ‘गीता’ या नावाने तो प्रचलित आहे. तो संस्कृतमधील विविध छंदांमध्ये आहे, त्यामुळे गीता गायली जाते. तिच्यातील ‘गीताधर्मा’चा आणि ‘विचार-विश्वा’चा सर्वांना परिचय करून देण्यासाठी ‘गीताधर्म मंडळ, पुणे’ ही संस्था गेली ९९ वर्षे अखंडपणे कार्य करीत आहे. २०२३-२४ हे संस्थेचे शताब्दी वर्ष आहे. केवळ श्रीमद्‌भगवद्‌गीतेसाठी काम करणाऱ्या दोनच संस्था भारतात आहेत, त्या म्हणजे ‘गीता प्रेस, गोरखपूर’ आणि ‘गीताधर्म मंडळ, पुणे’.

गीता महात्मा गांधींना वंदनीय होती. त्यांच्या मते गीतेमधील युद्धाचा आदेश हा भौतिक, सशस्त्र युद्धाचा नाही; तर मानवी मनात चाललेल्या सद्‌भावना व असद्‌भावना यांच्यातील युद्धाचा आहे. त्यांचे शिष्य विनोबाजी भावे यांनी आपल्या आईला गीता समजावी, या उद्देशाने ‘गीताई’ हे गीतेचे समश्लोकी मराठी भाषांतर केले व तमाम मराठी जनतेने त्यास उत्तम प्रतिसाद दिला. त्याचबरोबर विनोबाजींनी भूदान चळवळीच्या वेळी तुरुंगात केलेली ‘गीता प्रवचने’ही प्रसिद्ध आहेत. गीता रोज नवा अनुभव देते, असे ते मानत.

गीता म्हणजे संपूर्ण मानवजातीसाठी भारतीय चिंतनपरंपरेने दिलेली एक अमूल्य अशी भेट आहे. गीता कोणासाठी भक्तिग्रंथ आहे, कोणासाठी सांख्य तत्त्वज्ञान आहे, कोणासाठी योगशास्त्र आहे, कोणासाठी कर्म कसे करावे याचा पाठ आहे, तर कोणासाठी मोक्षग्रंथ आहे. थोडक्यात काय, तर ज्याला जे हवे, ते सर्व या ग्रंथात आहे. ज्ञानेश्वर माउलींनीही गीतेला ‘नित्यनूतन’ म्हटले आहे, म्हणजे प्रत्येकाला ती त्याच्या त्याच्या भावानुसार भावते. गीतेमधील तत्त्वज्ञान सर्वांना वेगवेगळ्या प्रसंगी, कसोटीच्या परिस्थितीत कसे वागावे याचे मार्गदर्शन करते. गीतेने केवळ हिंदूंनाच नव्हे, तर जगातील अध्यात्मवाद्यांना मोहून टाकले आहे; म्हणूनच आज जगभरात तिचा प्रसार आणि प्रचार वेगाने सुरू आहे.


संस्कृत भाषेला 'सुरभारती', 'गीर्वाणवाणी' म्हणजेच 'देववाणी', 'देवीवाक्', 'देवभाषा', 'अमरभारती' इत्यादी अन्य नावे आहेत. संस्कृतमध्ये लिहिलेले शिलालेख सर्वांत प्राचीन आहेत. ती सर्व भारतीय भाषांची जननी आहे. आपल्या मायबोली मराठीची तर जननी आहे, असेच आपण म्हणतो. पण अलीकडे ती मृतप्राय होत चालली आहे, असेही म्हटले जाते. मात्र या महापाठाच्या निमित्ताने नमूद करावेसे वाटते की, सहभागी झालेल्या सर्वांना श्रीमद्भगवद्गीता वाचता येत होती आणि त्यातील दीड हजार लोकांना तर ती मुखोद्गत होती. पूर्वी मूठभर लोकांना माहीत असलेल्या या भाषेचे स्मरण अनेकांना आहे आणि आपले भारतीय ग्रंथ, त्यांतील तत्त्वज्ञान जाणून घेण्यासाठी अनेक जण प्रयत्नही करत आहेत. आज जगभरात अनेक ठिकाणी चाललेल्या विनाशकारी युद्धाच्या काळात भारतीय तत्त्वज्ञान समृद्ध आणि समाधानाचे आयुष्य कसे जगायचे हे सांगते, याचा प्रत्यय लोकांना येत आहे, त्यामुळे अनेक लोक याकडे वळत असतील का?

'गीताधर्म मंडळ, पुणे' या संस्थेने आयोजित केलेल्या आणि संपन्न झालेल्या 'गीतापाठ महायज्ञा'त मला प्रत्यक्ष सहभागी होता आले व त्याचा अनुभव जवळून घेता आला, म्हणून हे सर्व तुम्हांला सांगावेसे वाटले. कदाचित यातून प्रेरणा घेऊन अजूनही काही लोक पुढे येतील व असे उपक्रम राबवतील अशी आशा करायला निश्चित वाव आहे.

**आरती घारे**
कार्यकारी संपादक


अभिनंदन!

इचलकरंजी संस्कृती प्रतिष्ठान



वसंत-कमल स्मृती
आत्मचरित्र पुरस्कार

काळ्यानिळ्या रेषा

◆

राजू बाविस्कर



## राजहंसी ग्रंथसृष्टी

# समांतर रंगभूमी : पल्याड-अल्याड

*एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकातील युरोप, अमेरिका आणि रशियामधील प्रायोगिक (समांतर) रंगभूमी आणि विसाव्या व एकविसाव्या शतकांतील २०१०पर्यंतची प्रायोगिक (समांतर) मराठी रंगभूमी यांचे विवेचन पुस्तकात केलेले आहे. हे करीत असताना नुसत्याच कालानुक्रमे घटना न सांगता; लेखक, दिग्दर्शक, नाट्यप्रयोग यांच्या याद्या न देता त्या त्या काळाची सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक पार्श्वभूमीही मांडली आहे.*

'समांतर रंगभूमी : पल्याड-अल्याड' हे माधव वझे यांचे पाश्चात्त्य आणि मराठी प्रायोगिक (समांतर) रंगभूमीचा आढावा घेणारे, अभ्यासकांना उपयुक्त असे पुस्तक आहे. लेखकाने आपल्या प्रारंभीच्या निवेदनात स्पष्ट केले आहे की, हा रंगभूमीचा इतिहास नाही. एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकातील युरोप, अमेरिका आणि रशियामधील प्रायोगिक (समांतर) रंगभूमी आणि विसाव्या व एकविसाव्या शतकांतील २०१०पर्यंतची प्रायोगिक (समांतर) मराठी रंगभूमी यांचे विवेचन येथे केलेले आहे. हे करीत असताना नुसत्याच कालानुक्रमे घटना न सांगता; लेखक, दिग्दर्शक, नाट्यप्रयोग यांच्या याद्या न देता त्या त्या काळाची सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक पार्श्वभूमीही मांडली आहे. तिच्या प्रकाशात त्या त्या प्रयोगांमध्ये प्रयोगांचे अन्वयार्थ लावणे सुकर ठरावे.

समांतर रंगभूमीचा आढावा घेताना आधी दृष्टी 'पल्याड' गेली, मग 'अल्याड' ही गोष्ट सूचक आणि उचित आहे; कारण मराठी समांतर रंगभूमीचा आणि मराठी समीक्षेचा प्रवास एका बाजूला पाश्चात्त्य आणि दुसऱ्या बाजूला संस्कृत नाट्यप्रणाली डोळ्यांपुढे ठेवून झाला आहे. समांतर रंगभूमीने आपल्या संस्कृत आणि मराठीची ही परंपरा नाकारली आणि नाट्यलेखन, प्रयोग सादरीकरण, नाट्यभाषा यांत पाश्चात्त्य नाट्यतत्त्वांचे, नवविचारांचे अनुकरण केले हे तर खरेच; तरीही ब्लॅक कॉमेडी, ॲब्सर्ड थिएटरमध्ये संस्कृत नाटकातील विदूषक वेगळ्या पद्धतीने येत राहिला आणि लोकरंगभूमीकडेही वळावे लागले. म्हणजे जगभर फिरून आपल्या मुळांकडे यावे लागले.

दुसऱ्या महायुद्धानंतर सर्व जगाला विविध पातळ्यांवर हादरे बसले. व्यक्ती, कुटुंब, समाजकारण, राजकारण, धर्मकारण, अर्थकारण बदलले आणि एकूणच

भारताच्या बाबतीत बोलायचे; तर आपली संस्कृती, आपली जीवनमूल्ये, श्रद्धा, माणसांतील नातेसंबंध यांवर प्रश्नचिन्हे निर्माण झाली. या वैचारिक भावनिक धक्क्यातून सावरताना, नवीन जीवनजाणिवांना सामोरे जाताना नाट्याशय, नाट्यतंत्र, रंगभाषा, थिएटरसंबंधीच्या कल्पना असे सगळेच बदलत गेले. ज्या भूमीवर दोन महायुद्धे झाली, तिथे हे बदल स्वाभाविकपणे तीव्रतेने प्रकट झाले. राखरांगोळीतून पुन्हा उभारी घेताना झालेल्या यातना, जगण्यातली विसंगती, निराशा, एकाकीपणा, मानसिक दुभंगलेपणा, संवेदनशून्यता असे सारे व्यक्त करताना नाट्यकृतीचे आविष्कारही बदलले. या सगळ्याचे पडसाद मराठी रंगभूमीवरही उमटू लागले, कारण प्रत्यक्षपणे नाही पण अप्रत्यक्षपणे आपल्याही जीवनधारणा, जीवनमूल्ये बदलत गेली. विज्ञानामुळे जग जवळ येत चालले. विश्वचक्राच्या आऱ्यांमध्ये सगळेच भरडले जाऊ लागले. हा सगळा आशय मराठी समांतर रंगभूमीवर वेगवेगळ्या पद्धतींनी येऊ लागला आणि प्रेक्षक भांबावून जाऊ लागले. भूतकाळातील रंगभूमीच्या रम्य आठवणींत रमणाऱ्या प्रेक्षकांना हे धक्के पचवणे आणि त्याआधी या नावीन्याचे, प्रयोगशीलतेचे आकलन होणे खरोखरच कठीण होते. त्या दृष्टीने मला हे पुस्तक फार महत्त्वाचे वाटते. 'अल्याड' कळायला 'पल्याड' आधी कळले पाहिजे; ही वरवर विसंगती वाटली तरी आपल्या पल्याड जिवाच्या असोशीने, रंगभूमीवरील निष्ठेने, तळमळीने, सतत अविश्रांत धडपड करून जी समांतर रंगभूमी प्रगल्भपणे उभी राहिली; तिचे ज्ञान आपल्या समांतर प्रायोगिक रंगभूमीचा लेखाजोखा घेताना आवश्यक आहे. पाश्चात्त्य प्रभावातूनच आपली प्रायोगिक रंगभूमी नवनवीन क्षितिजे धुंडाळत आली आहे. त्यातली सकारात्मक बाजू, मर्यादा, उणिवा यांचे भान येण्यासाठी हा धावता पण महत्त्वपूर्ण मागोवा निश्चितच दिशादर्शक आहे. यातील विवेचनामुळे एका परिप्रेक्ष्यात मराठी समांतर रंगभूमीकडे पाहता येईल.




हो आहे मुक्त मुशाफिरी... नानाविध प्रदेशांची,
भौगोलिक तसेच मानसिकही.
हेतू, साधने आणि साध्य
काहीही असो, आहे कमालीची आनंददायी
आणि चिंतनगर्भ.

आनंदाच्या दाही दिशा

एक मुक्त प्रवास

डॉ. आरती रानडे

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ४०)

लेखकाने हा मागोवा बोद्लेर (१८२१ ते १८६७ - फ्रान्स), आल्फ्रेड ज्झारी (१८७३ ते १९०७ - फ्रान्स) यांच्यापासून सुरू करून पीटर ब्रुक (१९२५ ते २०२२ - इंग्लंड) ह्यांच्या १९८५पर्यंतच्या कार्यापर्यंत घेतलेला आहे. समांतर मराठी रंगभूमीचा आढावा १९४८ ते २०१० या काळापर्यंतचा आहे. पुस्तकातील छायाचित्रेही मूळ आशयाला पूरक आहेत. सुरुवातीला एका पानावर 'साप्ताहिक मौज' १९२५मधील एक उद्धृत छापले आहे. ते खूप चिंतनीय आहे. ते असे आहे -

'ज्या काळी कोणतीही कला संक्रमणावस्थेत असते, त्या काळी प्रयोग म्हणून पुढे येणाऱ्या प्रत्येक कृतीकडे उदार दृष्टीनेच पाहिले पाहिजे. प्रयोगादाखल बऱ्याच कृती पुष्कळ वेळा आपल्याला न आवडणाऱ्या, न पटणाऱ्या असणे अनिवार्य असते.'

एखादी कलाकृती आवडण्या - न आवडण्याचा संबंध अभिरुचीशी, वैयक्तिकतेशी असतो; पण पटण्या - न पटण्याचा संबंध बौद्धिकतेशी असतो. त्यामुळे दोन्ही दृष्टींनी आपल्या मर्यादांची जाणीव ठेवून प्रयोगाशीलतेकडे खुल्या, स्वच्छ नजरेने पाहायला शिका, हा प्रेक्षकांसाठी फार मोठा धडा १९२५ साली म्हणजे जवळजवळ शंभर वर्षांपूर्वी दिला आहे. ही मराठी रंगसमीक्षेची फार मोठी ताकद आहे. पुढच्या पानावर पीटर ब्रुक यांची दोन विधाने उद्धृत केली आहेत. तीही या पुस्तकाचा घाट ज्यासाठी घातला आहे, त्या उद्दिष्टाकडे वाचकांचे सुरुवातीलाच लक्ष वळवणारी आहेत. या तीनही उद्धृतांमुळे पुस्तकातील आशयाला अर्थगांभीर्य आणि विचारसौंदर्य प्राप्त झाले आहे. या औचित्याला वंदन!

प्रा. माधव वझे हे इंग्रजीचे प्राध्यापक, अभ्यासक. (प्राध्यापक असूनही) सुमारे ६०-७० वर्षे रंगभूमीचे साक्षीदार, अभिनेते आणि अन्य नात्यांनी प्रत्यक्ष सहभागी. त्यामुळे हा मागोवा घेताना ऐतिहासिक घटनाक्रम सांगत असताना त्यांनी केलेल्या टिप्पण्या


ले. जनरल एसपीपी थोरात, ॲडमिरल भास्करराव सोमण,
फील्डमार्शल सॅम माणेकशा, ले. जनरल प्रेम भगत,
ले. जनरल सगतसिंग आणि ले. जनरल पंकज जोशी.
भारतीय सैन्यदलातील पराक्रमाची सहा उत्तुंग शिखरे!
त्यांच्या अमर कर्तृत्वाच्या या स्फूर्तिदायक कहाण्या...

दुर्दम्य
भारतीय सैन्यनेतृत्वाची उत्तुंग शिखरे

मेजर जनरल शशिकांत पित्रे (निवृत्त)

किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ४०)



अर्थबहुल आणि मर्मग्रही आहेत. तेच या लेखनाचे श्रेय आणि बलस्थान आहे.

युरोपमधील आधुनिक समांतर रंगभूमीचे स्वरूप समजून घेण्यासाठी एकोणिसाव्या शतकातील स्वच्छंदवादी कवींच्या काव्याकडे लक्ष वळवावे लागते, असे सांगून लेखकाने शेली, कोलरिज्, कीट्स, बायरन यांचा उल्लेख करून चार्स बोद्‌लेर (१८२१ ते १८६७), राम्बो (१८५४ ते १८९१), मालार्मे (१८४२ ते १८९८) या फ्रेंच कवींविषयी लिहिले आहे. या तिघांनी पूर्वसुरींची स्वच्छंदवादी विचारसरणी काव्य आणि नाटक या दोन्ही क्षेत्रांत अधिक मुक्तपणे व्यक्त केली. स्वच्छंदवादात निसर्गप्रेम, आत्मनिष्ठा, 'स्व'चा शोध हे सारे अभिप्रेत होते. स्वच्छंदवादी चळवळ १८२४च्या सुमाराला संपुष्टात आली. पण या प्रतीकवादी कवींनी तो वारसा अधिक सूक्ष्म आणि अंतर्मुख स्वरूपात सुरू ठेवला. प्रतीकवाद्यांनी स्वतंत्र सौंदर्यशास्त्र विकसित केले. बोद्‌लेरने अनैतिकतेतील सौंदर्याकडे लक्ष वळवले. मालार्मे हा 'कलेसाठी कला' या घोषणेचा उद्‌गाता ठरला. या मंडळींचे 'लक्ष्य' होता मध्यमवर्ग! त्यांच्या नीतिकल्पना! जीवनमूल्ये! बोद्‌लेरने त्याविरुद्ध बंड केले आणि अनैतिकतेचे सौंदर्यशास्त्र विकसित केले.

प्रतीकवादी कवींना अभिप्रेत असलेला 'स्व'चा शोध आल्फ्रेड ज्झारी या फ्रेंच नट-दिग्दर्शकाने रंगभूमीच्या माध्यमातून घेतला, तसाच तो जाँकोक्तो या नाटककारानेही घेतला, असे सांगून पुढे अतिवास्तववाद म्हणजे 'दादाइझम' याविषयीचे विवेचन केले आहे. प्रतीकवादी आणि अतिवास्तववादी रंगभूमीला समांतर असा प्रवाह होता, वास्तववादी आणि यथातथ्यवादी. फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळची स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्ये एकोणिसाव्या शतकातील औद्योगिक क्रांतीनंतर मागे पडली. १८४८मध्ये कम्युनिस्ट जाहीरनामा प्रसिद्ध झाला. याच काळात 'कलेसाठी कला' या घोषणेविरुद्ध 'जीवनासाठी कला'चा उद्‌घोष सुरू झाला. वास्तववाद आणि यथातथ्यवादाचा पुरस्कार केला गेला. यथातथ्यवादाला डार्विनच्या 'उत्क्रांतिवादा'चा संदर्भ होता. एमिल झोला हा या रंगभूमीचा प्रवर्तक. इब्सेन आणि स्ट्रींडबर्ग हे दोघे वास्तववादी व यथातथ्यवादी रंगभूमीचे महत्त्वाचे नाटककार. त्यांच्या काही नाटकांना मानसशास्त्रीय वास्तववादी




मेहमूद, किशोरकुमार, प्राण, हेलन या सर्वार्थानं मोठ्या
कलाकारांच्या द्वारकानाथ संझगिरी यांनी
खास त्यांच्या स्टाईलनं सांगितलेल्या गोष्टी.

आम्हाला वगळा...

द्वारकानाथ संझगिरी

किंमत : ₹ २९०/- । (ट.ख. ₹ ४०)

बैठक होती, तर बर्नार्ड शॉची नाटके ही विचारनाट्ये होती. इब्सेन, स्ट्रींडबर्ग, बर्नार्ड शॉ आणि अंतोन चेखव हे वास्तववादी - यथातथ्यवादी रंगभूमीचे चार महत्त्वाचे नाटककार असे सांगून आंत्वानच्या रंगभूमीची चर्चा केली आहे. यथातथ्यवादी रंगभूमीवरील एक लक्षणीय नाव म्हणजे स्तानिस्लावस्की. भरत मुनींच्या नाट्यशास्त्रानंतर जागतिक रंगभूमीवर अभिनय कलेची सैद्धांतिक मांडणी करणारे रशियन दिग्दर्शक आणि तत्त्ववेत्ते म्हणजे स्तानिस्लावस्की. त्यांच्या भावस्मृतीच्या मुद्द्याची आणि त्यांच्या 'मॉस्को आर्ट थिएटर'ची चर्चा येथे उत्तम रीतीने येते. स्तानिस्लावस्कीचा शिष्य असलेल्या मेयरहोल्डला त्याच्या नाटकांमधला वास्तववाद उथळ वाटत होता. त्याने नटाचे शरीरच केंद्रस्थानी असले पाहिजे, अशी भूमिका घेऊन बायोमेकॅनिक्स (शरीराचे तंत्रज्ञान) हा सिद्धान्त मांडला. त्याचे पडसाद पुढे ग्रोटोस्कीच्या रंगभूमीवर उमटले. १९१७मध्ये रशियात राज्यक्रांती झाली आणि समाजवादी वास्तववाद ही संकल्पना पुढे आली. अतिवास्तववादी रंगभूमीच्या संदर्भात आर्तोसह, रिचर्ड वॅग्नर, आदोल्फ, आपिआ, गॉर्डन क्रेग यांच्याविषयी लिहून पुढे ब्रेख्तची नाटके, ॲब्सर्ड रंगभूमी याविषयीची आणि आयेनेस्कोच्या विचारांची चर्चा येते. १९४५मध्ये दुसरे महायुद्ध संपल्यानंतर रंगभूमीचे जे विविध आविष्कार पुढे आले, त्यांची माहिती दिली आहे. त्यात 'लिविंग थिएटर', 'द ओपन थिएटर', 'ब्रेड अँड पपेट थिएटर', 'थिएटर लॅबोरेटरी' अशा संस्था, 'हॅपनिंग'सारखे प्रयोग - ही सगळी धडपड, प्रयोगशीलता, काही विशिष्ट उद्दिष्ट किंवा सिद्धान्त डोळ्यापुढे ठेवून चालली होती. बरेच नाटककार, दिग्दर्शक यांच्या प्रयोगांविषयी, नाट्यसंस्थांविषयी येथे वाचायला मिळते. अखेरीला चर्चा येते, ती पीटर ब्रुक या ब्रिटिश दिग्दर्शकाच्या कार्याची. त्यांनी केलेले विविध नाट्यप्रयोग, १९७१मध्ये त्यांनी स्थापन केलेले


अभिनंदन!

कवितेचे घर (जि. चंद्रपूर)



बापुरावजी पेटकर काव्य सन्मान २०२३

रक्तफुलांचे ताटवे

नोमेश नारायण



'आंतरराष्ट्रीय रंगभूमी संशोधन केंद्र', त्यांचे 'महाभारत'चे सादरीकरण, त्यासाठी भारतात येऊन प्रत्यक्ष केलेला अभ्यास हे सगळे अद्‌भुतच आहे. एकूणच गेल्या दीडशे वर्षांत युरोप, अमेरिका, रशिया येथील रंगकर्मींनी रंगभूमी म्हणजे काय, या प्रश्नाचा जो प्रयोगशीलतेने, निष्ठापूर्वक असोशीने शोध घेतला; 'कलेसाठी कला', 'जीवनासाठी कला' या दोन प्रणालींचा प्रामाणिकपणे वेध घेतला, विशिष्ट जीवनविषयक तत्त्वज्ञानाला अनुसरून कलेचे स्वातंत्र्य जपण्याचा उद्‌घोष केला हे सारे चिंतनीय आहे. अभिनिवेश न बाळगता जे विविध प्रयोग त्यांनी केले, त्यामुळे पाश्चात्त्य रंगभूमी सशक्त झाली. या पार्श्वभूमीवर आपल्याकडील प्रायोगिक रंगभूमीचे चित्र कसे दिसते, त्याचा आढावा 'अल्याड'मध्ये येतो.

आपल्याकडील प्रायोगिक रंगभूमीबद्दल बोलायचे, तर प्रयोगशीलता या संकल्पनेबद्दलच गोंधळ उडालेला दिसतो. काहीतरी 'नवे' म्हणजे प्रायोगिक नव्हे. केवळ परंपरा नाकारणे म्हणजे बंडखोरी नव्हे, तर आपल्या परिवर्तनवादी भूमिकेला जो विरोध होईल, जे रान उठेल; त्याची जोखीम पत्करणे, नाकारले जाण्याची तयारी ठेवणे आणि त्यासाठी किंमत मोजणे. आपल्याकडे काही नाटककारांना, संस्थांना, नटांना अशी किंमत मोजावी लागली आहे. हा इतिहास सर्वांना ठाऊक आहे. आत्माराम भेंडे आणि प्रा. माधव मनोहर या दोघांनी प्रायोगिक रंगभूमीचा पाया रचला, असे लेखकाचे प्रतिपादन आहे. 'नाट्यमन्वंतर'च्या 'आंधळ्यांची शाळा'ची प्रायोगिकता फक्त रंगमंचीय प्रयोगापुरतीच होती. विशिष्ट मूल्यभाव असलेले, परिवर्तनवादी विषय-आशय यांची त्यात उणीव होती. ही मर्यादा दाखवून 'सशाची शिंगे', 'आई', 'कक्षा' या नाटकांतील प्रायोगिकतेच्या पाऊलखुणांकडे लक्ष वेधले आहे. हा इतिहास कथन करीत असताना आजूबाजूच्या घटना, वातावरण यांच्या पार्श्वभूमीचे महत्त्व अधोरेखित केले आहे. मर्ढेकरांची कविता, अनियतकालिकांची चळवळ, राज्य नाट्य स्पर्धा यांतून जीवनविषयक आधुनिक धारणा प्रकट होत गेल्या. सुमारे एक दशक 'रंगायन'चे होते. या संस्थेने प्रायोगिक रंगभूमी म्हणजे काय ते दमदारपणे दाखवले. पुढे 'आविष्कार', 'पीडीए', 'थिएटर ॲकॅडमी' या संस्थांच्या नाटकांचा आढावा येतो. 'तुघलक', 'घाशीराम कोतवाल', 'बेगम बर्वे', 'महानिर्वाण' या नाट्यप्रयोगांचे महत्त्व, वैशिष्ट्ये यांचा महत्त्वपूर्ण आढावा येतो. 'छबिलदास' रंगमंचाची बलस्थाने आणि मर्यादा यांची चर्चाही लेखकाने केली आहे. समीपनाट्यगृहे या दृष्टीने 'छबिलदास', 'पृथ्वी थिएटर', 'सुदर्शन रंगमंच' यांचे महत्त्व आहे. आज तर छोट्या नाट्यगृहांची मागणी वारंवार होते आहे. अंगणात, गच्चीवर, एखाद्या घराच्या हॉलमध्येही नाट्यप्रयोग केले जात आहेत. याचा अर्थ रंगमंचाविषयीच्या, प्रेक्षक आणि प्रयोगकर्ते नट यांच्यातील नात्यासंबंधीच्या कल्पना बदलत चालल्या आहेत. काही ठिकाणी नाट्यप्रयोग संपल्याबरोबर प्रेक्षक त्यावर चर्चा करतात, ही गोष्टही लक्षणीय आहे.

सत्यदेव दुबे यांचे मराठी रंगभूमीला योगदान, मराठीखेरीज इतर प्रादेशिक

भाषांमधील नाटकांचे आपल्याकडे झालेले प्रयोग हे सगळे मराठी रंगभूमीविकासकारक होते. गो. पु. देशपांडे, शफाअत खान यांची राजकीय विचारसरणीची नाटके, मध्यमवर्गीयांच्या मानसिकतेचा वेध घेणारी श्याम मनोहर, चं. प्र. देशपांडे यांची नाटके यांनी आशय-विषयाच्या बाबतीत नवे प्रयोग केले असे म्हटले पाहिजे. यापेक्षा वेगळ्या पद्धतीने अधिक तरल, सूक्ष्म जीवनजाणिवा व्यक्त करणारे राजीव नाईक हेही एक महत्त्वाचे नाटककार. प्रायोगिक रंगभूमीवर त्यांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. प्रायोगिक रंगभूमीवरील अतुल पेठे यांचे कार्य दृष्टीआड करता येणार नाही. समकालीन, राजकीय, सामाजिक परिस्थितीवर एका विशिष्ट भूमिकेतून ठामपणे सातत्याने भाष्य करीत राहणे, हे त्यांचे वैशिष्ट्य. नव्वदच्या आणि नंतरच्या दशकातील तरुण पिढीने एकूणच कौटुंबिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक मूल्यांचा गोंधळ; त्यामुळे खावे लागणारे मानसिक धक्के, तरुण पिढीसमोर आ वासून उभे राहिलेले प्रश्न यांचे चित्रण केले. धर्मकीर्ती सुमंत, मनस्विनी लता रवींद्र, आशुतोष पोतदार, हिमांशु स्मार्त ही या संदर्भातील काही नावे. लिव्हइन रिलेशनशिप, समलिंगी संबंध, आर्थिक भ्रष्टाचार, कौटुंबिक दुरावा, जीवनाचे यांत्रिकीकरण हे विषय त्यांनी अपरिचित, समाजमान्यता नसलेल्या भाषेतून बेधडकपणे मांडले. दलितांचे प्रश्न मांडणारी, स्त्रियांचे प्रश्न मांडणारी प्रभावी नाटकेही आली. दलित नाटकांसंबंधी लिहिताना प्रा. वझे यांनी ‘किरवंत’ नाटकासंबंधित लिहिले आहे. ते म्हणतात, ‘दलित जाणिवा हा फक्त दलित म्हणून जन्माला आलेल्यांचा प्रश्न नसून प्रत्यक्ष सवर्णांमध्येही काही जणांना दलि त समजले जाते आणि म्हणूनच जातीधर्मातीत असा हा माणूसपणाचा प्रश्न आहे, हे निर्विवादपणे सिद्ध केले प्रेमानंद गज्वी यांच्या ‘किरवंत’ (१९९१) या नाटकाने.’ पण किरवंतांना म्हणजेच स्मशानात धार्मिक विधी करणाऱ्या पुरोहितांना कोणीही, कधीही दलित समजत नसत. किरवंत फक्त दक्षिण कोकणात म्हणजे सिंधुदुर्ग जिल्ह्यात होते. त्यांना कोणतीही कमी दर्जाची वागणूक मिळालेली नाही. अशोक जोशी या किरवंताने गज्वी यांना ही माहिती दिली, असे त्यांनी किरवंत नाटकाच्या पुस्तकात नमूद केले


मराठी गझलेच्या प्रदेशात मध्यरात्रीही तळपळणारा सूर्य
म्हणजे सुरेश भट! त्या भटांचे गंडाबंध शागिर्द
म्हणजे दीपक करंदीकर. त्यांना लाभला गुरूंचा
सोनेरी सहवास. त्यातून साकारलेले –

गझलसम्राटाच्या सहवासात

दीपक करंदीकर

किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ४०)



आहे आणि त्या आधारावर त्यांनी नाटकाची उभारणी केली आहे. पण ते मूळ प्रमेय चुकीचे आहे. नाटककाराला त्यात नाट्यबीज सापडले. त्यांचा कल्पनाविलास, त्यांचे स्वातंत्र्य हे सगळे मान्य. नाटक चांगले आहे. प्रयोगही चांगला होत असे. पण त्यातील मूळ आशय सत्याला धरून नाही. कोणीही एक व्यक्ती सांगते ते सत्यच असते, असे नाही. स्वत: अशोक जोशी विवाहित होते. सगळ्या नातलगांशी त्यांचे चांगले संबंध होते. किरवंतांना विवाह, मुंज, सत्यनारायण पूजा या ठिकाणी आमंत्रण दिले जात असे. पुण्यामध्येही मोघे गुरुजींची कोणीही अवहेलना केल्याचे ऐकिवात नाही. 'किरवंत'मधील मूळ आशयासंदर्भात माहिती मिळवूनच मी हे लिहीत आहे, हे कुठेतरी नोंदले जाणे आवश्यक आहे; म्हणून येथे थोडे विस्तृत लिहिले.

मराठी प्रायोगिक रंगभूमी ऐंशी-नव्वदच्या दशकात नाटकांचे विषय, आशय याबाबत अर्थपूर्ण होती. पण 'नाट्यमन्वंतर'पासून पुढेही बंडखोरी आवश्यक तेवढी केली गेली नाही, असे लेखकाचे निरीक्षण आहे. मग तेंडुलकर यांच्या नाटकांचे काय? त्यांनी बंडखोरी केली नाही का? नाकारले जाण्याचे, प्रखर विरोध होण्याचे धोके त्यांनी पत्करले नाहीत का? असे प्रश्न पडतात. मराठी प्रायोगिक रंगभूमी शब्दप्रधान राहिली, रंगभाषेचे महत्त्व तिला कळले नाही; असे मत येथे व्यक्त केले आहे. ज्या ज्या वेळी स्वयंघोषित सेन्सॉरशिपने झुंडशाही करून नाटके बंद पाडली, नाटककारावर हल्ले केले; त्या वेळी रंगकर्मी एकमेकांच्या पाठीशी उभे राहिले नाहीत, हे अतिशय कटू विदारक सत्य इथे लेखकाने स्पष्टपणे मांडले आहे. मग अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर बोलण्याचा नैतिक अधिकार राहतो का, हा प्रश्नच आहे.

एकूण या पुस्तकात पाश्चात्त्य आणि पौर्वात्य प्रायोगिक समांतर रंगभूमीविषयीचे जे मौलिक विवेचन केलेले आहे, ते अतिशय महत्त्वपूर्ण आहे. लेखकाचे आणि 'राजहंस प्रकाशना'चे मन:पूर्वक अभिनंदन!

***मेधा सिधये***




साठोत्तर प्रायोगिक (समांतर) मराठी रंगभूमीचे केवळ साक्षी नव्हे, तर निरनिराळ्या नात्यांनी प्रत्यक्ष सहभागी असलेले प्रतिभावान रंगकर्मी माधव वझे यांनी अनेक संदर्भबिंदूंच्या मदतीने घेतलेला पाश्चात्त्य आणि मराठी रंगभूमीचा अभ्यासपूर्ण वेध.

समांतर रंगभूमी :
पल्याड-अल्याड

माधव वझे

किंमत : ₹ २९०/- । (ट.ख. ₹ ४०)



# चित्र पाहीन आवडी

## कावड-कथा

कथा सांगणे, ही परंपरा भारतात शेकडो वर्षे चालत आलेली आहे. अनेक कथांनी वैदिक, पौराणिक साहित्य रंगलेले आहे. संगीत, नृत्य आणि नाट्याची जोड देऊन परिपूर्ण अनुभव देणारे ‘पंडावानी’ हे बिहारमधील लोककलेतील सादरीकरण असो, किंवा आपल्याकडील संगीतमय कीर्तनपरंपरा असो, अथवा त्याला पुढे घेऊन जाणारे सतीश आळेकरांचे ‘महानिर्वाण’सारखे नाट्य असो; सगळे कथेला पोषक वातावरण तयार करते. तसेच चित्रातून कथा सांगणे, ही परंपरा फार प्राचीन आहे. अगदी प्रसिद्ध उदाहरण म्हणून आपण सांची स्तूपावरील शिल्पे किंवा अजंठा येथील चित्रे पाहू शकतो. ही शिल्पे अथवा चित्रे पाहताना त्यासंबंधी कथा सांगणारे भिक्षू आणि ऐकणारे भक्त असले की अनुभव परिपूर्ण होतो.


आता ही कथा सांगणारी कला आणि चित्रकला गावोगावी नेणारी काही मंडळी पूर्वी आपल्या समाजात दूरचित्रवाणी आणि ओटिटी सुधारणेपूर्वी अस्तित्वात होती आणि तो समाजातील कला अभिरुचीचा आणि करमणुकीचा महत्त्वाचा भाग होता. महाराष्ट्रातील चित्रकथी परंपरा; प्रकाशाचा वापर करून दाखवली जाणारी, चर्म-बाहुल्या वापरून सादर केलेली दक्षिणेतील कथा अथवा राजस्थानातील कावड कथा परंपरा ही याची काही प्रमुख उदाहरणे होत. आपण ‘कावड’ शब्द ऐकला की पाणी वाहण्याची कावड किंवा श्रावण बाळ ह्या प्रसिद्ध कथेची आठवण होणे साहजिक आहे. परंतु आता जी कावड म्हणत आहोत, ती थोडी वेगळी आहे. ही काहीशी कपाटासारखी देव्हारा स्वरूपाची असते.

वीर योद्धे, देव-देवता, पुराणकथा परंपरांमधील होरो-वीर यांच्या कथा पोवाड्यात गाणारी आणि त्याला अनुरूप चित्रे असलेला देव्हारा गावोगावी घेऊन फिरणारी मंडळी कावड-कला जिवंत ठेवून होती आणि आहेत. हा देव्हारा म्हणजे लाकडी कपाट असून सादरीकरणात एकेक कप्पा उलगडत जातो, तसे एकएक चित्र पुढे येते आणि कथानक उलगडत जाते. ही कपाटे वेगळी तयार केलेली असून अनेक दारे एकमेकांत बसवलेली असतात. त्या विशेष रचनेमुळे आणि फळीला फळी लावून बिजागऱ्यांनी एकमेकांत बसवली असल्याने वेगळा परिणाम साधला जातो. चित्रे लोककला धाटणीची असून ठळक रेषांचा वापर मानवाकृती आणि झाडझाडोरा इत्यादींच्या रेखाटनासाठी केलेला असतो. रंग सपाट पद्धतीने भरलेले असून भडक रंग चित्राकडे लक्ष वेधून घेतात.



कावड परंपरेवर प्रसिद्ध डिझाइनर निना संबनानी ह्या विदुषीने संशोधन करून मोठा ग्रंथ लिहिला आहे. त्यांनी स्वत: ॲनिमेशन क्षेत्रात नवे प्रयोग कावड परंपरेला घेऊन केले आहेत. ते प्रयोग यूट्यूब चॅनेलवर उपलब्ध आहे.

कावड परंपरा पुढे नेणारे आणि समकालीन कलेत महत्त्वाचे मानले जाणारे चित्रकार म्हणून गुलाम मोहम्मद शेख ह्या चित्रकाराचे योगदान महत्त्वाचे ठरते. त्यांनी समकालीन कलाजगतात कावडकला सर्वप्रथम अंतर्भूत केली. विविध आकारांची कपाटे करून घेऊन त्यावर आपली चित्रे रेखाटली. गुलाम सरांची चित्रे भारतीय दृश्यसौंदर्याने परिपूर्ण आहेत. शेखसर बडोद्यात आणि पुढे 'रॉयल कॉलेज लंडन' येथे उच्च शिक्षणसाठी कॉमन वेल्थ स्कॉलरशिप घेऊन गेलेले कलावंत. 'कला इतिहास' हा विषय 'महाराजा सयाजीराव विद्यापीठा'त अनेक वर्षे शिकवलेला आणि अनेक विद्यापीठांमध्ये ह्या विषयांवर व्याख्याने दिलेली. ह्या कारणाने कला इतिहासाचे अनेक संदर्भ त्यांच्या चित्रांत वारंवार दिसतात. 'कावड अल्फाबेट स्टोरीज' ह्या संकल्पनेवर अक्षरे वापरून केलेली कावड किंवा 'कावड अयोध्या/मिराज (मृगजळ)' ही २००४ साली तयार केलेली कलाकृती आपण तपशिलाने पाहू. अशा अनेक कावडी त्यांनी केल्या. एक फूट उंच आणि तेवढीच आडवी अशी पेटी आणि दारे उघडली की तीन फूट असा सर्वसाधारण आकार असतो. ह्या दारांवर शेख यांनी केलेली दृश्यभाषेतील विविध चित्रे पाहणे, ही एक पर्वणी असते. अनेक भारतीय शैली ते त्या शैलीची खासियत तशीच ठेवून अनेकांगांनी वापरतात. मृगजळ ह्या चित्रात ते मध्यभागी असलेल्या कोनाड्यात रामजन्माविषयीचे चित्र रेखाटतात. आणि केरळ भित्तिचित्र स्वरूपाच्या शैलीचा वापर करताना दिसतात.




एका दाराला अयोध्येचे निसर्गदृश्य रेखाटले आहे. अगदी लोककला स्वरूपातील दृश्याप्रमाणे हिरवे ढग असलेले दिसतात आणि दुसऱ्या दारावर बाजूला पंडिताचे चित्र. अगदी थेट आपण नाथद्वार शैली पाहत आहोत, असा भास होणारे. कान टोचलेल्या पंडिताचा चेहरा दिसत आहे. मागील पॅनलवरदेखील वेगवेगळे चेहरे आहेत आणि एका बाजूला आगसदृश आकार आहेत. संपूर्ण कावड काळ्या रंगाची असून प्रभावी रंगात रंगवलेली आहे. रंग वापरताना शेखसर हिरव्याचा तजेला टिकवतात, निळ्याची निळाई दाखवतात, किंवा पिवळ्याची प्रकाशमयता एखाद्या प्रकाशमय रेषेप्रमाणे दिसते. ती ती शैली हवी तेथे उद्धृत करून एकूण चित्राला नवा अर्थ ते देतात आणि काही प्रतिमा एकत्र आणून भारतीय दृश्याचा अनुभव तिच्या डोळ्यातून देत आहे, असे वाटते. कावड अयोध्या/मिराज (मृगजळ) ह्या नावातच चित्राचा विषय आणि आशय दिसून येतो.

'चित्र पाहीन आवडी'च्या ह्या भागात आपण 'कावड' चित्रविषय पाहत असताना चित्राचा पृष्ठभाग बदलला की त्याचे संदर्भ बदलतात, चल स्वरूपाची ही कलाकृती आहे. आता कावडीचा कथन हा मूळ हेतू बाजूला ठेवून नवे प्रयोग महत्त्वाचे, का हेतू तोच ठेवून केलेले प्रयोग महत्त्वाचे ह्यावर चर्चा आणि मतभेद होणे स्वागताचे ठरू शकते.

***नितीन हडप,*** ९३७२४१८६१५

## ‘चित्रकला’ या विषयावरील ‘राजहंसी’ पुस्तके



प्राचीन काळापासून ते भारतीय आधुनिक कलाप्रवाहापर्यंतचे एकमेकांत गुंफलेले धागे चित्रकाराच्या मर्मदृष्टीने आणि कलाअभ्यासकाच्या वस्तुनिष्ठतेने उलगडून दाखवणारा ग्रंथ.

कलेतील भारतीयत्वाची चळवळ

**द बॉम्बे रिव्हायव्हलिस्ट स्कूल**

सुहास बहुळकर

किंमत : ₹ ६००/- । (ट.ख. ₹ ४०)


दीनानाथ दलालांनी जनसामान्यांच्या घराघरांत आणि मनामनांत आपली चित्रे पोहोचवली. विविध प्रयोगांमधून कलेची वेगवेगळी क्षितिजे धुंडाळणाऱ्या या रंगरेषाप्रभूच्या जीवनाचे वेगवेगळे पैलू दर्शवणारे वेधक चरित्र

रंगांचा जादूगार

**दीनानाथ दलाल**

डॉ. अनंत देशमुख

किंमत : ₹ १७०/- । (ट.ख. ₹ ४०)







१८५७-१९५० या काळाच्या पार्श्वभूमीवर आजवर अपरिचित असलेल्या पाच स्त्री चित्रकार! अँजेला त्रिंदाद, अंबिका धुरंधर, विमल गोडबोले, मारी हेंडरसन, मग्दा नाख्मन यांच्या कौटुंबिक जीवनाचा आणि कर्तृत्वाचा शोध आणि बोध!

‘बाँबे स्कूल’ कला परंपरेतील

**स्त्री चित्रकार** (१८५७-१९५०)

साधना बहुळकर

किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ४०)




# असे जन्मले पुस्तक

## भावनिक प्रथमोपचार घरच्याघरी

'भावनिक प्रथमोपचार घरच्याघरी' हे माझे 'राजहंस'ने प्रकाशित केलेले तिसरे पुस्तक. 'प्रश्न मनाचे' या माझ्या पहिल्या पुस्तकाचे, मी बाबांच्या (डॉ. नरेंद्र दाभोलकर) सोबत सहलेखन केले होते. ह्या पुस्तकाची कल्पना त्यांचीच होती. बाबांनी त्यांचे सहकारी प्रा. प. रा. आर्डे यांच्यासोबत 'अंधश्रद्धा : प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम' नावाचे पुस्तक साधारण १९९० साली लिहिले होते. अंधश्रद्धेविषयी सातत्याने विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची शास्त्रीय उत्तरे, असे ह्या पुस्तकाचे स्वरूप होते. सध्या त्या पुस्तकाची अठरावी आवृत्ती चालू आहे. त्याच स्वरूपाचे पुस्तक मानसिक आरोग्याविषयी लिहावे, अशी बाबांची कल्पना होती. त्यामधून 'प्रश्न मनाचे' या पुस्तकाचा जन्म झाला. ह्या पुस्तकामधला 'मानसिक आरोग्या'विषयीचा भाग मी लिहिला आणि 'अंधश्रद्धा आणि मानसिक आरोग्य' हा भाग बाबांनी लिहिला होता. पुस्तकाचा पहिला खर्डा वाचून झाल्यावर डॉ. बोरसे सरांनी मला हळूच सांगितले की, ''तुझे बाबा राजहंसचे वाचकप्रिय लेखक आहेत, पण ह्या पुस्तकातील तू लिहिलेला भाग अधिक चांगला झाला आहे!'' तेव्हा अंगावर मोरपीस फिरवल्यासारखी झालेली भावना अजूनसुद्धा मला नीट आठवते!


राजहंसने प्रकाशित केलेले माझे दुसरे पुस्तक 'विवेकाच्या वाटेवर : उन्मादी कालखंडातील एका लढ्याची गोष्ट'. ह्याचादेखील बाबा हे अविभाज्य भाग आहेत : पण ज्या पार्श्वभूमीवर हे पुस्तक मी लिहिले, ती परिस्थिती मात्र एकदम विपरीत होती. २० ऑगस्ट २०१३ला बाबांचा पुण्यात खून केला गेला. महाराष्ट्राच्या सामाजिक कार्याच्या इतिहासात समाजसुधारणेचे काम करणाऱ्या लोकांना दुर्लक्षित किंवा बहिष्कृत केले गेले होते; त्यांच्यावर शेण टाकले गेले होते, जिवंतपणी त्यांच्या अंतयात्रा काढल्या होत्या; पण विचार पटले नाहीत म्हणून आपल्या




किंमत : ₹ २००/- । (पृ.सं. ४०)

वैचारिक विरोधकाचा खून करायचा, असे मात्र घडले नव्हते. हा एका व्यक्तीवर नाही, तर एका विचारधारेवर केलेला हल्ला होता. तो संविधानक मूल्यव्यवस्थेवर केला गेलेला हल्लादेखील होता. त्याविषयी काही न करता नुसते गप्प बसणे, हे शक्य नव्हते. बाबांच्या खुनाच्या नंतरच्या पहिल्या सहा वर्षांत जी कामे त्यांनी उभी करण्यात त्यांचा प्रमुख सहभाग होता, म्हणजे प्रामुख्याने 'अंनिस' आणि त्यासोबत 'साधना' व 'परिवर्तन' ही त्याच तळमळीने चालू ठेवण्याचे जे प्रयत्न झाले, त्याचा हे पुस्तक म्हणजे दस्तऐवज आहे. मला मनात खोलवर कुठे तरी आपण हे लिहिलेच पाहिजे, अशी जाणीव होती.

महाराष्ट्र अंनिसचे काम लोकांपर्यंत पोचण्यात त्याविषयी बाबांनी केलेले लिखाण हा एक अत्यंत महत्त्वाचा भाग होता आणि ती जबाबदारी बाबा जवळजवळ एकहाती पार पाडत होते. त्यांच्या जाण्याने यामध्ये एक खूप मोठी पोकळी निर्माण झाली होती. आपली सगळी शक्ती पणाला लावून आपण ती पोकळी शक्य तितकी भरून काढण्याचा प्रामाणिक प्रयत्न करायला पाहिजे, अशी माझी एक प्रबळ आंतरिक भावना होती. जसे एका बाजूला ह्यामध्ये मला वाटणाऱ्या जबाबदारीचा भाग होता, तसेच माझे स्वत:चे मानसिक स्वास्थ्य ठीक राहण्यासाठीदेखील हे लिखाण मला अत्यंत आवश्यक होते. 'आम्ही दगड मारण्याऐवजी नाटक करतो' असा एक लेख ह्या पुस्तकात आहे. त्यामध्ये व्यक्त केलेली भावनादेखील हीच आहे. तीच भावना थोडी पुढे नेऊन मी दगड मारण्याऐवजी हे पुस्तक लिहिले. पण मला याची अगदी नम्र जाणीव आहे की अंनिस, परिवर्तन आणि साधना यांमधील डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या विचारांवर प्रेम करणाऱ्या आणि ते वृद्धिंगत व्हावे म्हणून प्रयत्न करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांच्या कामाचा हा दस्तऐवज आहे. मी तो केवळ शब्दबद्ध केला आहे. ह्या सगळ्या कालखंडातील जीवन-अनुभवांची प्रतवारीच अशी होती की, ह्यामधील बहुतांश लिखाण हे थेट आतून आलेले आहे. त्यामध्ये मी एकदा लिहून झाल्यावर फारसे बदल केले नाहीत. हे पुस्तक त्या कालखंडात लिहिले

पद्मभूषण माधव गाडगीळ म्हणजे एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व!
केवळ निसर्गप्रेमी वा निसर्ग-अभ्यासकांनाच नव्हे,
तर भवतालाबद्दल कुतूहल असणाऱ्या प्रत्येकाला
एका वेगळ्या विविधरंगी जगाचे दर्शन घडवणारी
त्यांची जीवनसफर.

सह्याचला आणि मी : एक प्रेमकहाणी

माधव गाडगीळ

किंमत : ₹ ८००/- । (ट.ख. ₹ ४०)

नसते, तर परत कधीच माझ्याकडून लिहून झाले नसते, याची मला खात्री आहे. हे सगळे लिहून झाल्यावर आपल्या डोक्यावरचे एक खूप मोठे ओझे उतरले आहे, अशी माझी भावना अनेक काळ राहिली.

राजहंसच्या अंकासाठी 'विवेकाच्या वाटेवर' किंवा 'भावनिक प्रथमोपचार घरच्याघरी' यांपैकी कोणत्याही एका पुस्तकाच्या जन्माची गोष्ट मी लिहावी, असे मला आरती घारे यांनी सांगितले; तेव्हादेखील मी 'विवेकाच्या वाटेवर'विषयी लिहायचे टाळून केवळ 'भावनिक प्रथमोपचार घरच्याघरी'विषयी लिहायचे, असे ठरवले होते. पण लिहीत असताना माझ्या लक्षात आले की, वरची पार्श्वभूमी हीच माझी 'भावनिक प्रथमोपचार घरच्याघरी' या तिसऱ्या पुस्तकामागची गोष्ट आहे. तारुण्यात आलेल्या प्रत्येक मुलाला आपल्या बापाचे बोट सोडून स्वतःचा रस्ता शोधायला लागतो. मानसशास्त्राच्या परिभाषेत त्याला Individuation म्हणतात. तसे 'भावनिक प्रथमोपचार घरच्याघरी' हे माझे लेखक म्हणून ज्यात माझे Individuation झाले, असे पुस्तक आहे. माझ्या स्वतःच्या कामाविषयी हे पुस्तक आहे. ज्याचा म्हंटला तर मागच्या दोन्ही पुस्तकांशी संबंध आहे आणि म्हंटले तर ते पूर्णपणे स्वतंत्र पुस्तक आहे. 'मानसोपचार' हा विषय पोस्ट ग्रॅज्युएशनसाठी निवडण्यामागची माझी मूलभूत प्रेरणाच ही मानसिक आरोग्यविषयी शास्त्रीय माहिती आणि सुविधा ह्या जास्तीत जास्त लोकांपर्यंत त्यांना परवडेल अशा दरात घराच्या जवळ पोचाव्यात, ही होती. त्यामुळे गेल्या पंधरा वर्षांत मानसिक आरोग्याच्या क्षेत्रात मी 'परिवर्तन' संस्थेच्या माध्यमातून जे काम केले, त्या कामामध्ये मला जे अनुभव आले आणि शिकायला मिळाले, त्या आधारावर या पुस्तकाची आखणी माझ्या मनात होत गेली. भारतासारख्या देशात जर शंभर लोकांना मानसिक आरोग्य सुविधांची गरज असेल, तर त्यामधील सरासरी पंधरा-वीस लोकांनादेखील ती मिळत नाही. ती अधिकात अधिक लोकांपर्यंत


डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या प्रत्येक पुस्तकातून, लेखातून, त्यांच्या व्याख्यानांतून, मुलाखतीतून, उक्ती आणि कृतीतून विवेकवादाचे पाऊल पुढे पडत राहिले. ही विवेकाची वाटचाल भविष्यातही पुढे चालू राहावी, यासाठी हा पुस्तकप्रपंच.

विवेकाच्या वाटेवर

उन्मादी कालखंडातील लढ्याची गोष्ट

डॉ. हमीद दाभोलकर




आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ४०)

पोचण्याच्या यंत्रणा काय असतील त्यांचा अभ्यास आणि प्रयोग करणे, हे काम मी परिवर्तन संस्थेमार्फत करतच असतो, पण आपल्या इथल्या शासनव्यवस्थेची अनास्था बघता आपले शासन हे नजीकच्या भविष्यात असे काही करेल, याविषयी मला थोडीदेखील आशा वाटत नाही. मग शेवटी लोकांनीच आपले मानसिक आरोग्य जपण्याची जबाबदारी स्वत:कडे घेणे आवश्यक आहे, असे मला जाणवू लागले. त्यामधून या पुस्तकाचा जन्म झाला.

मानसिक आरोग्याविषयी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मी भाषणे दिली. त्यामध्ये भावनिक प्रथमोपचार ही संकल्पना मांडल्यावर लोकांचे डोळे एकदम चमकतात, त्यांना काही तरी नवीन गवसल्यासारखे वाटते, हे मी अनेक ठिकाणी अनुभवले होते. त्यामधून 'भावनिक प्रथमोपचार घरच्याघरी' या नावाचा जन्म झाला. आपल्या कुटुंबाचे भावनिक स्वास्थ्य जपणारी कोणी तरी समंजस व्यक्ती आपल्या बहुतांश जणांच्या घरात असते. घरातील कुरबुरी, ताणतणाव यांच्या वेळी अशी व्यक्ती आपल्याला आधार देत असते. त्यामधील बऱ्याच गोष्टी ते अनुभवातून शिकलेले असतात. त्यांना आणि कुटुंबातील बाकीच्या लोकांनादेखील याविषयी शास्त्रीय माहिती सोप्या भाषेत मिळेल, असा प्रयत्न ह्या पुस्तकात मी केलेला आहे. जगभरात भावनिक प्रथमोपचार म्हणून ज्या गोष्टी मान्यताप्राप्त आहेत, त्यांच्या पलीकडे जाऊन भारतीय समाजातील कुटुंबव्यवस्था आणि जीवनपद्धती लक्षात घेऊ. मी अनेक गोष्टी यामध्ये समाविष्ट केलेल्या आहेत. परिवर्तन आणि अंनिसचे मानसमित्र आणि मैत्रिणी यांना सहज समजून घेता येऊ शकेल आणि त्यांना उपयोगी पडेल असे ते पुस्तक व्हावे, म्हणून मी जाणीवपूर्वक प्रयत्न केले आहेत. आपल्याकडून कालजयी असे काहीतरी लिहून व्हावे, अशी अनेक लेखकांची इच्छा असते! आपल्याच्याने तसे लिखाण होण्याची सुतराम शक्यता नाही, हे माहीत असल्याने माझ्या अंतर्मनाने शॉर्टकट म्हणून हे पुस्तक लिहिण्याचा मार्ग काढला की काय, असा विचारदेखील अधूनमधून माझ्या मनात डोकावून जातो! जोपर्यंत माणूस आहे, तोपर्यंत मानसिक अस्वस्थता आहे आणि तिला घरच्याघरी हाताळण्याची गरजदेखील राहणारच आहे, हे त्यामागचे गणित असावे. उत्तम पाककृती घरच्याघरी करण्याविषयीची पुस्तके जशी प्रत्येक घरात असतात आणि जसे स्वयंपाक करणाऱ्या लोकांच्या अनेक पिढ्या ती पुस्तके वाचतात, तसेच 'भावनिक प्रथमोपचार घरच्याघरी'देखील लोक वाचतील, अशी फँटसी मी अधूनमधून बघत असतो!



***डॉ. हमीद दाभोलकर***



# आठवणींच्या खिडकीतून

## बाभूळबन - भावभावनांची आंदोलने

वर्षानुवर्षे गाठभेट न झालेल्या एखाद्या मित्र-मैत्रिणीची कधीतरी अचानक सय यावी आणि अस्वस्थ वाटावे, तसे काहीसे गतकाळातल्या काही नाटकांच्या आणि नाट्यप्रयोगांच्या आठवणीने होते. राहून राहून वाटते, करण्याजोगी नाटकेच नाहीत अशी तक्रार करणारे आपले हे रंगकर्मी मित्र, मागे केव्हातरी झालेल्या नाटकांचा धांडोळा का घेत नाहीत? ज्या अनेक नाटकांबद्दल आणि त्यांच्या प्रयोगांबद्दल असे एकसारखे वाटत राहते, त्यामध्ये एक आहे, ‘बाभूळबन’.

एका मूकबधिर युवतीला बोलायला शिकविण्याचे अशक्यप्राय आव्हान एका युवकाने स्वीकारले आहे. आपल्या मुलीला बोलायला शिकविण्याचे तिच्या वडिलांचे सगळे प्रयत्न व्यर्थ ठरले आहेत. युवती स्वभावाने विक्षिप्त आणि हट्टी आहे. ज्यांनी कोणी तिला बोलायला शिकविण्याचा प्रयत्न केला, त्यांना दगडावर डोके आपटल्याचाच अनुभव आला आहे. अशा परिस्थितीत एक युवक पुढे आला आहे.

आपल्या रंगभूमीची ओळख असलेले कोणीही अटकळ बांधतील की हे नाटक सुखान्त असणार. ती अटकळ कितीशी बरोबर आहे?

नाटक सुरू होते, तेव्हा बोलायला शिकण्याची त्या युवतीची अजिबात इच्छा आणि तयारी नाही. तो युवक मात्र ते आव्हान स्वीकारायला उत्सुक आहे. नाटक संपते, तेव्हा दोघांच्या भूमिका बदललेल्या दिसतात. त्या दोघांच्या वेळोवेळीच्या भेटींमधून, सहवासातून जे नाते निर्माण होते, परस्परांमधील जो विश्वास त्यांच्या अनुभवाला येतो; त्याची परिणती अशी होते की त्या युवतीने बोलायला शिकणे, हे त्या युवकाला अजिबात महत्त्वाचे वाटत नाही आणि त्या तरुणीच्यापुरते मात्र त्या एकाच गोष्टीला महत्त्व आले आहे. ती तरुणी बोलायला शिकते किंवा नाही, हा प्रश्नच राहत नाही. एका बिंदूपाशी सुरू झालेली दोघांची वाटचाल दुसऱ्या बिंदूपाशी पूर्ण होताना त्यांच्या मनोभूमिकांमध्ये झालेला लोभस बदल - हे या नाटकाचे मर्म आणि त्याचे सौंदर्य आहे. वाटचालीच्या दरम्यान राग, संताप, असाहाय्यता, पश्चात्ताप, केविलवाणेपणा, उत्साह, उभारी, सहानुभूती ह्या आणि इतर कितीतरी भावभावनांची आंदोलने हा ‘बाभूळबन’चा एकूण अनुभव आहे.


नाटकाचे शीर्षक प्रतीकात्म आहे. त्या तरुणीचे वडील बांधकाम व्यवसायात आहेत. बाभळीचे रान असलेल्या एका वैराण जागी त्यांनी एक सुंदर इमारत बांधली

आहे. एक चमत्कारच जसा काही त्यांनी करून दाखविला आहे. पण आपल्या मुलीचे आयुष्य बदलता येऊ शकते यावर मात्र त्यांचा विश्वास नाही, आणि त्यासाठी त्यांना वेळही नाही.

त्या मूकबधिर मुलीशी उमद्या स्वभावाच्या तरुणाने किंवा तिच्या वडिलांनी संवाद साधायचा, तर तिच्याशी खुणांच्या भाषेत बोलायला हवे आणि खुणांनी ते जे काही व्यक्त करतात, ते प्रेक्षकांना कळावे यासाठी त्या अर्थाची वाक्ये तरुण आणि वडील यांनी बोलून दाखवायला हवीत. म्हणजे ही सगळीच प्रक्रिया नाट्यप्रयोगाच्या प्रवाहीपणाला बाधक ठरणारी आणि प्रेक्षकांना कंटाळवाणी वाटणारी.

पण या अडचणीला ओलांडून नाट्यप्रयोग त्याच्या सुंदर लयीमध्ये पुढे जात राहिला. एकतर कलाकारांनी खुणांची भाषा पूर्णपणे आत्मसात केली होती. पात्रांचे प्रत्यक्ष बोलणे आणि खुणांची भाषा ह्यांचा सहजसुंदर मेळ प्रयोगात जमून आला होता.

लिखित नाटकाला रंगमंचावरील त्याच्या प्रयोगामध्येच पूर्णता येते, असे म्हटले जाते. त्याचा नेमका प्रत्यय 'बाभूळबन'च्या प्रयोगाने दिला. गिरीश जोशी नाटकाचे लेखक आणि प्रयोगाचे दिग्दर्शक असल्यामुळे नाटक लिहितानाच त्यांनी रंगभाषेचाही अंतर्भाव संहितेमध्ये केलेला दिसतो. नाटकातील त्या उत्साही तरुणाच्या मनामध्ये जी प्रचंड खळबळ उठली आहे, ती नाट्यप्रयोगात शब्दांमधून व्यक्त केली नव्हती. संगीताच्या कल्लोळाने सारा अवकाश व्यापून टाकणारा एक स्वतंत्र प्रवेशच ते सगळे सांगून गेला! प्रवेशभर एक शब्द बोलला जात नाही, फक्त संगीतच प्रवेशभर बोलते ही आपल्या रंगभूमीवरची अभूतपूर्व घटना होती. उत्सुकता म्हणून नाटकाची संहिता पाहिली, तर रंगमंचावरील प्रकाशाची उघडझाप कमीअधिक तीव्रतेने आणि वेगाने


मिस्कील आणि मनस्वी. प्रेमळ आणि फटकळ.
नर्मविनोदी आणि स्पष्टवक्ती. आग्रही आणि पारदर्शी.
सईच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू
उलगडणारे आत्मकथन!

सय

माझा कलाप्रवास

सई परांजपे

आवृत्ती सहावी । किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ४०)

कशी व्हावी, ह्याचीही रंगसूचना गिरीश जोशी ह्यांनी केलेली होती!

नाटक मनाच्या रंगभूमीवर पाहिले जाऊ शकते, हे अर्धसत्य आहे. वाचक नाटक वाचतो; तेव्हा त्याच्या कल्पनेनुसार तो जो अनुभव घेत जातो, तो तुटकतुटक असतो. नाट्यप्रयोग सेंद्रिय म्हणजे organic अनुभव देतो. नेपथ्यरचना, प्रकाशयोजना, संगीतयोजना, वेषभूषा - रंगभूषा, पात्रांच्या विरचना (blocking) आणि नटनटींचा अभिनय अशा सगळ्या घटकांचा एकमेळ नाट्यप्रयोगामध्ये असतो. आणि तसा तो असायलाच पाहिजे. पण याचे भान किती नाटककार आणि दिग्दर्शकांना असते? आणि प्रेक्षकांनाही?

‘बाभूळबन’चा ‘महाराष्ट्र कल्चरल सेंटर’ ह्या तेव्हा म्हणजे नव्वदच्या दशकात रंगभूमीवर स्वत:ची ओळख निर्माण केलेल्या पुण्यातल्या संस्थेने सादर केलेला प्रयोगही लक्षणीय होता. मेधा आठवले आणि मिलिंद फाटक ह्यांची निवड करून दिग्दर्शकाने नाट्यप्रयोगाचे यश निश्चित केले होते जसे काही. दोघांनाही त्यांच्या भूमिकेची उत्तम समज असल्याचा अनुभव प्रयोगाने दिला होता. मेधा आठवले यांचे डोळे विलक्षण बोलके, आणि त्या भूमिकेसाठी ते अत्यावश्यकच, तर मिलिंद फाटक यांचे बोलणे आणि रंगमंचीय वावर उत्कट आणि सहज. त्यांची जोडी छान जमली होती रंगमंचावर.

आज कोणी ह्या ‘बाभूळबन’चा प्रयोग करील, तर वर्षानुवर्षे गाठभेट न झालेल्या एखाद्या मित्र-मैत्रीणीची भेट झाल्याचा विलक्षण आनंद होईल. कोणालाही.

**माधव वझे**
९६०४८४८०३३

समीक्षकांपासून रसिकांपर्यंत, ‘पेन’सेनांपासून ‘कान’सेनांपर्यंत
साऱ्यांना सहप्रवासी बनवणारी;
संगीताची नवी उमज आणि नवी समज करून देणारी
एक सांगीतिक यात्रा!

गान गुणगान
एक सांगीतिक यात्रा
सत्यशील देशपांडे




आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ४०)

## 'राजहंसी' विविधा




'साहित्य अकादमी युवा पुरस्कार' विजेता काव्यसंग्रह!
समकालीन वास्तवात सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक अंगाला भिडणाऱ्या निरनिराळ्या अवस्थांच्या कविता!

### मी संदर्भ पोखरतोय

पवन नालट

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ४०)


एकाच कवीने तीन वेगवेगळ्या काळांच्या पटावर नजर ठेवून आयुष्याचे जे तत्त्वज्ञान तयार केले आहे, ते जगण्याचा हिशेबच. हा कवितासंग्रह म्हणजे कवीच्या जगण्याचा वैचारिक लेखाजोखा!

### आतून उगवलेल्या कविता

प्रा. प्र. द. कुलकर्णी

किंमत : ₹ १७०/- । (ट.ख. ₹ ४०)




रंगीबेरंगी वातावरणात रंगलेले शैशव. नंतर रानावनात हिंडण्याची, निसर्गात रमण्याची नितांत आवड. कुंवार जंगलाचे अननुभूत सुख आणि अरण्यवासी आदिवासींचे निसर्गजीवन जवळून पाहताना मनावर पडलेली रानाची मोहिनी.
यातून उमललेल्या कवितांच्या भावफुलांमधून श्वासाश्वासात सामावलेला काव्यगंध.

### रानगंध

मीनल प्रधान

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ४०)

# क...
# कवितेचा

मराठी मनाच्या सर्जनशीलतेला
पाऊलवाट देणारे सदर

## की आणखी काही...

चेहरे....निर्विकार, नि:स्तब्ध
मनं...सावध, सुरकुतलेली

सुरकुत्या...काळजीच्या, वेदनेच्या
सुरकुत्या...अनिश्चिततेच्या
सुरकुत्या...कालातीत प्रश्नांच्या

अनिश्चितता...सोबतीची
घालमेल...अस्तित्वाची

अस्तित्व...देहातील कंपाचे
नाडीच्या ठोक्यांचे
ठोके... प्रारब्धाचे, नियतीचे
नियती...तुझी, माझी...प्रत्येकाची

प्रत्येक चेहरा... मूक, सहनशील
न बोलता बोलणारा

प्रत्येक मन...
चोच खुपसून बसलेलं शहामृग

प्रत्येक सुरकुती...
पिढ्यांचा मागोवा सांगत निपचित

अस्तित्वाच्या सीमारेषेवर
तुडुंब भरलेली हॉस्पिटल्स...

ये-जा अखंड
मीही त्यातलाच एक!

इथे येणारा देह...
श्वास घेऊन माघारी जाईलच,
शाश्वती नाही!
इथून जाणारा देह...
कुठे जाईल, खात्री नाही!

चौऱ्याऐंशी लक्ष योनीभ्रमण...
मोक्ष... की आणखी काही?

***शेखर जोशी***

## खास बालवाचकांसाठी लिहिलेली 'राजहंसी' पुस्तके

मागवा खालीलपैकी १ पुस्तक किंवा ३ पुस्तके - ट.ख. ४०/-




स्थलांतर करू पाहणाऱ्या पक्ष्यांच्या एका थव्याला, प्रवासामध्ये अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. एका टप्प्यावर प्रत्यक्ष नेत्याचे नीतिधैर्य संपते. नेताहीन थवा दिशाहीन होऊन विखुरतो, प्रवासात शिकून शहाणा होत असलेला एक लहान पक्षी त्याला धीर देतो. त्याची गोष्ट सांगणारे -

**नंदनवन** (संगीत-नृत्य-नाट्य)

माधव वझे

किंमत : ₹ ५०/- । (ट.ख. ₹ ४०)

बुद्धिमत्ता असूनही केवळ मुलगी म्हणून विज्ञानसंस्थांमध्ये प्रवेश नाकारला जाण्याचा तो काळ. अनेक अडचणींना तोंड देत, लढवय्या वृत्तीने त्या पुढे गेल्या आणि जैवरसायनशास्त्राच्या क्षेत्रात मूलभूत संशोधन केले. त्यांचे प्रेरक चरित्र-

लढाऊ वृत्तीच्या वैज्ञानिक **कमला सोहोनी**

वर्षा गजेंद्रगडकर

किंमत : ₹ ८०/- । (ट.ख. ₹ ४०)







केरळमधल्या एका लहानशा गावात जन्मलेल्या. प्रतिकूल परिस्थितीतही विज्ञानशाखेचे शिक्षण घेणाऱ्या भारतातल्या पहिल्या महिला वनस्पतिशास्त्रज्ञ. आपले सगळे आयुष्य संशोधनाला वाहिलेल्या स्त्री शास्त्रज्ञाची स्फूर्तिदायक गोष्ट.

**वनस्पतिशास्त्रज्ञ जानकी अम्मल**

वर्षा गजेंद्रगडकर

किंमत : ₹ ८०/- । (ट.ख. ₹ ४०)

## उद्‌गार

नियतकालिकांचे/
समाजमाध्यमांचे अभिप्राय

*‘राजहंस प्रकाशना’चे सर्वेसर्वा दिलीप माजगावकर यांनी ११ नोव्हेंबर २०२३ रोजी वयाची ८० वर्षे पूर्ण केली. त्याची दखल अनेक वृत्तपत्रांनी घेतली, तसेच सुहृदांनी शुभेच्छा देऊन आपल्या भावना प्रकट केल्या. त्यातील निवडक लेख व शुभेच्छा सुरुवातीला देत आहोत.*

प्रिय स्नेही दिगमा, नअस्कार!

तुमची पहिली आठवण सांगू? नागनाथ पाराजवळच्या राजहंसच्या कचेरीत तुम्ही बसला होता. एक सुंदर युवती हातात वह्यांची चळत घेऊन आली. जिला बघून श्वास अडकावा, असं तिचं आरस्पानी सौंदर्य! राजहंसच्या कचेरीत दिवे गेले होते, तरी चांदणे पडल्यासारखा उजेड होता. तुम्ही त्या नवयौवनेला घाईघाईनं सांगितलंत, ‘‘डॉक्टर (बोरसे) पलीकडे बसतात!’’ ‘इश्शं!’ असं म्हणून ती तरुणी लाजली... प्रिय दिगमा, तुमच्या मुखातून मी ऐकलेला हा पहिला संवाद - ‘‘डॉक्टर (बोरसे) पलीकडे बसतात!’’ अहाहा, हौ क्यूट!

तुमच्या लेखकांना तुम्ही हृद्य पत्रं लिहून प्रोत्साहन देता, कौतुकाची थाप मारता! (पाठीवर हं... बाकी थापा तुम्हाला अजिबात जमत नाहीत.) तुमची कौतुकपत्रं वाचून अनेक नवोदित लेखकांची वजनं चोवीस तासांत वाढल्याची उदाहरणं आहेत. माझ्या परिचयाच्या एका लेखकाला तर तुमचं कौतुकपत्र वाचून मधुमेह जडला!! तुम्ही लेखकांशी बोलता, त्यांना विषय सुचवता, लिहायला प्रवृत्त करता. मग त्याचं पुस्तक प्रेमानं प्रकाशित करता. प्रकाशित झालं रे झालं की लागलीच तुमचं पत्र येतं. हे म्हंजे ‘आंधळा मागतो एक डोळा, देव देतो दोन आणि वर रेबॅनचा गॉगल फ्री!’ असंच झालं ना? एक तर तुम्ही पुण्याचे. पुण्याच्या माणसानं कुणाचं दिलखुलास कौतुक करावं, ही बाब दुर्मीळच. (खरं तर अशक्यच!) पुणेकर असूनही तुम्ही स्नेहाळ मनाचे आहा!!

प्रिय दिगमा, सहस्रचंद्रदर्शनाच्या आगळ्यावेगळ्या निमित्तानं मी ठरवलं, की तुम्हालाच शुभेच्छापत्र लिहायचं. तुम्ही नावाजलेले प्रकाशक आहा! त्यापेक्षा नाणावलेले पत्रलेखक आहा! त्याहीपेक्षा वाचकप्रिय व्यक्तिचित्रलेखक आहा! त्याहीपेक्षा तुम्ही एक अप्रतिम मित्र आहा! त्याहीपेक्षा तुम्ही एक असामान्य माणूस

आहा!! त्याहीपेक्षा... त्याहीपेक्षा... त्याहीपेक्षा... छे, स्नेहपत्र लिहिणं कित्ती अवघड आहे, ते आत्ता कळलं!




ऐंशीव्या वर्षाचं निमित्त साधून तुमची दोन पुस्तकं सिद्ध झाली आहेत. त्यांतलं एक तुम्ही आजवर लिहिलेल्या पत्रांचं- 'पत्र आणि मैत्र'. दुसरं तुम्ही वेळोवेळी केलेल्या भाषणांचं आणि लिखाणांचं संकलन- 'वाणी आणि लेखणी'. प्रशांत दीक्षित, सारंग दर्शने, डॉ. बोरसे, मंगला आठलेकर, रेखा माजगावकर, आरती घारे यांनी या संकलन-संपादनाचं काम मोठ्या निगुतीनं केलं आहे. मध्यंतरी एक-दोनदा राजहंसच्या कचेरीत जाणं झालं होतं, तेव्हा प्रशांतराव दीक्षित एका कोपऱ्यातल्या खोलीत टेबलाशी चहा पीत पीत काम करताना दिसायचे. किंवा काम करताहेत, असं दाखवत चहा पीत असायचे. तेव्हा असं दोन पुस्तकांचं प्रोजेक्ट येतंय, याची कुणकुणही त्यांनी वा तुम्ही लागू दिली नाहीत हं मला! आणि आता ही मस्त पुस्तकं पेश केलीत. (आता या कामाच्या बदल्यात दिगमांचं एकेक कौतुकपत्र या सगळ्या लेखकमित्र वा मित्रलेखकांच्या पत्त्यावर एव्हाना रवाना झालं असेल, याचीही खात्री आहे.) असो.

खटाववाडीत मौजेच्या कचेरीच्या छतावरची कबुतरं श्री. पु. भागवतांच्या बोलण्यानुसार घुमत असत, असं ठणठणपाळनं नोंदवून ठेवलं आहे. नागनाथ पाराजवळच्या राजहंसच्या कचेरीत असं काही नाही. पण डॉ. बोरसे आहेत ना! ते पुरेसे आहेत!! तुम्ही पुण्यातल्या काही निवडक परमस्नेहींसाठी जेवण ठेवल्याचं कानावर आलं. स्थळ आणि मेन्यू गुप्त ठेवण्यात आला आहे. नाहीतर तिथे येऊन धडकले असते! प्रेमात सगळं क्षम्य असतं, बरं!! पण असू दे! तुमच्यासोबत 'प्रभा'चा किंवा 'स्वरूप'चा सिंगल बटाटेवडाही मी गोड मानून घेईन! तुमच्यासारखं सुंदर पत्र नाहीच लिहिता आलं, पण भावना समजून घ्या. आणखी वीस वर्षांनी जेवणाला नक्की बोलवा हं! तेव्हा बटाटेवडा चालणार नाही, आत्ताच सांगून ठेवत्ये!

खूप शुभेच्छा.

***- फक्त तुमचीच***

***कु. सरोज चंदनवाले***


(*'सकाळ'*, २५ नोव्हेंबर २०२३मधून साभार)



**दि**गंत तुमची कीर्ती त्याला साजेसे कर्तृत्व
**ली**न वाचकापुढे तरीही सोडिले ना स्वत्व
**प**रंपरा जपताना सदैव शोधत आला नवे
**मा**न ठेवला ज्येष्ठांचा पण तरुण तुम्हाला हवे
**ज**रा न ढळली श्रेयसाप्रति नजर कधी तुमची
**गा**ठलेत जरी ध्येय तुम्ही ना बाधा गर्वाची
**व**संत राहो असाच तुमच्या सुरेल जगण्यात
**क**से करावे अभिष्टचिंतन केवळ शब्दांत
**र**हा आम्हाला देत प्रेरणा आमच्या जगण्यात!

**खूप खूप शुभेच्छा!**

संजय भास्कर जोशी, 'पुस्तक पेठ'



# ओळख आपल्या विश्वाची

आपल्या डोक्यावरच्या अंतराळात केवळ ग्रह-तारे नाहीत, तर इतर अनेक अद्‌भुत गोष्टी भरलेल्या आहेत. सामान्य माणसाला अज्ञात अशा अनेक ‘सुरस आणि चमत्कारिक’ वस्तू तसेच घटना यांनी हे विश्व बनलेले आहे. अशा या विश्वाचा परिचय सुप्रसिद्ध खगोल-अभ्यासक डॉ. गिरीश पिंपळे यांनी अतिशय सहज-सोप्या भाषेत त्यांच्या ‘ओळख आपल्या विश्वाची’ या पुस्तकात करून दिला आहे.

मनोगतातच लेखकाने सांगितले आहे की, हे पुस्तक ‘खगोलशास्त्र’ या विषयातील जाणकार व्यक्तींसाठी लिहिलेले नाही, तर या विषयाची आवड निर्माण व्हावी किंवा असलेली आवड वाढीस लागावी यासाठी लिहिलेले आहे. पिंपळे यांनी एकंदर नऊ प्रकरणांत या विषयाची सुबोध मांडणी केली आहे. पहिल्या प्रकरणात ‘जग आणि विश्व’ तसेच ‘आकाश आणि अंतराळ’ या शब्दांमध्ये असलेला फरक नेमक्या शब्दांत स्पष्ट केला आहे. आपण रोजच्या व्यवहारात जग आणि विश्व हे शब्द किती ढिलेपणाने वापरतो, ते त्यावरून आपल्या सहज लक्षात येते. अथांग अंतराळ शब्दविरहित, दिशाहीन, काळेकुट्ट आणि प्रचंड थंड असल्याची अनोखी माहिती या पहिल्याच प्रकरणात मिळाल्याने पुढची प्रकरणे वाचण्याची उत्सुकता खूपच वाढते.

लेखकाने पुढच्या प्रकरणांची रचना विचारपूर्वक केल्याचे जाणवते. दुसरे प्रकरण आपल्या सौरमालेची सविस्तर माहिती देते. सर्व घटकांची वैशिष्ट्ये सांगत लेखकाने काही अतर्क्य गोष्टीसुद्धा नोंदवल्या आहेत. शुक्र ग्रहावरचा दिवस त्याच्यावरच्या वर्षापेक्षा मोठा आहे आणि तेथे सूर्य पश्चिमेला उगवून पूर्वेला मावळतो, ही विधाने आपल्याला अशक्य कोटीतील वाटली तरी ती खरी आहेत. अशाच अद्‌भुत गोष्टी विश्वात असल्याने त्याबद्दलची माहिती रंजक बनली आहे. तिसरे प्रकरण





जागतिक दर्जाचे खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर
यांच्या सिद्धहस्त लेखणीतून उमटलेल्या
मूळ हिंदी पुस्तकाचा सुबोध,
रसाळ मराठी अनुवाद.

## ताऱ्यांची जीवनगाथा

डॉ. जयंत नारळीकर
अनुवाद : डॉ. पुष्पा खरे

किंमत : ₹ १४०/- । (ट.ख. ₹ ४०)

आकाशगंगेविषयी, तर चौथे 'विश्वरूपदर्शन' घडविणारे आहे. ही सारी माहिती वाचताना आपण स्तंभित होतो. विश्वाची निर्मिती, त्याची रचना, त्याचे प्रसरण अशा अनेक गहन गोष्टींची माहिती लेखकाने सोप्या भाषेत दिली आहे. कृष्णद्रव्य आणि कृष्णऊर्जा म्हणजे काय, हेही समजावून सांगितले आहे. विश्व प्रसरण पावते आहे, हे आता सर्वमान्य झाले आहे. पण हे प्रसरण किती काळ चालू राहील, विश्वाचा शेवट होईल का आणि कशा प्रकाराने होईल अशा अनेक यक्षप्रश्नांची चर्चा पिंपळे यांनी साध्या भाषेत केली आहे. त्याहीपुढे जाऊन, आपले विश्व हे एकमेव विश्व नाही, असे काही वैज्ञानिकांचे म्हणणे आहे - म्हणजे अशी अनेक विश्वे अस्तित्वात असू शकतात, अशी मती गुंग करणारी माहिती लेखकाने दिली आहे. 'नक्षत्रांचे देणे' असे चपखल शीर्षक दिलेल्या प्रकरण पाचमध्ये ताऱ्यांच्या जीवनचक्राचे वर्णन मनोरंजक पद्धतीने आले आहे. ताऱ्याचा मृत्यू, कृष्णविवर, श्वेत खुजा तारे, महाराक्षसी लाल तारे अशा अनेक घटना / वस्तूंचे स्पष्टीकरण या प्रकरणात आपल्याला वाचायला मिळते. सहावे प्रकरण दीर्घिका, क्वासार आणि तारकागुच्छ यासंबंधी आहे.


आकाशाबाबत कितीही माहिती वाचली, तरी या विषयाची खरी मजा ही प्रत्यक्ष आकाश-निरीक्षणामध्येच असते, असे लेखक सातव्या प्रकरणाच्या सुरुवातीस म्हणतो ते अगदी खरे आहे. त्यामुळे या प्रकरणाला 'आकाशाशी जुळवा नाते' असे अगदी सुयोग्य शीर्षक देण्यात आले आहे. आकाशाचे वाचन करण्यासाठी कोणकोणत्या संकल्पना माहीत हव्यात, याचे अगदी नेमके मार्गदर्शन डॉ. पिंपळे यांनी केले आहे. असे वाचन करताना पाळावयाची पथ्ये, घ्यायची खबरदारी यांबाबतसुद्धा त्यांनी सूचना दिलेल्या आहेत. साध्या डोळ्याने, द्विनेत्रीतून तसेच दुर्बिणीतून आकाशात काय काय पाहता येईल, याची पद्धतशीर माहिती लेखकाने दिली आहे. आठवे प्रकरण खगोलात घडणाऱ्या विविध घटनांबद्दल आहे. ग्रहणे, धूमकेतूचे आगमन, उल्कापात,

लहानथोरांच्या मनात एकाच वेळी कुतूहल अन् जिज्ञासा
निर्माण करणाऱ्या आणि त्याच वेळी त्यांना अचंबितही
करणाऱ्या या विश्वाचा सुबोध परिचय करून देण्यासाठी
सुप्रसिद्ध खगोलतज्ज्ञ गिरीश पिंपळे
यांनी रोखलेली दुर्बीण म्हणजे -

ओळख आपल्या विश्वाची

डॉ. गिरीश पिंपळे

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ४०)



अधिक्रमण, पिधान युती अशा अनेक घटनांची माहिती या प्रकरणात येते. खगोलशास्त्र या विषयाबाबत नेहमी विचारला जाणारा प्रश्न म्हणजे ‘याचा सामान्य माणसाला उपयोग काय?’ शेवटच्या म्हणजे नवव्या प्रकरणात लेखकाने याचा ऊहापोह केला आहे. या विषयाशी निगडित अनेक गैरसमजसुद्धा आहेत. उदा. ग्रहांचा मानवी जीवनावर होणारा परिणाम, ग्रहणे, उडत्या तबकड्या, बर्म्युडा त्रिकोण इत्यादी. याही बाबतीत लेखकाने अतिशय उपयुक्त माहिती दिली आहे. शेवटी मराठी-इंग्रजी आणि इंग्रजी - मराठी अशा दोन शब्दसूची दिल्या आहेत; त्यामुळे वाचकांची मोठी सोय झाली आहे.

या पुस्तकात दिलेल्या रंगीत छायाचित्रांचा (१६ पाने) उल्लेख केलाच पाहिजे. ती अतिशय सुंदर आहेत. पुस्तकाचा कागद, छपाई आणि मांडणी ‘राजहंस’च्या परंपरेला साजेल अशीच आहे. या पुस्तकाचे इंग्रजीत भाषांतर होणे खूप आवश्यक आहे, असे सुचवावेसे वाटते.

***सुनीत पोतनीस***

(*‘लोकसत्ता’*, ९ जुलै २०२३मधून साभार)

राजकारण आणि समाजकारण या दोन तलवारी एकाच म्यानात राहत नाहीत, हे वचन खोटं ठरवणाऱ्या कार्यकर्त्या. स्थानिक प्रश्नांवर काम करताना वैश्विक घडामोडींचं भान ठेवून उत्तरं शोधणाऱ्या नेत्या.

ऐसपैस गप्पा नीलमताईंशी

करुणा गोखले

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३६०/- । (ट.ख. ₹ ४०)







ध्वनिप्रदूषणाविरोधात न्यायालयीन लढे देणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकाचं रूपांतर सजग, कृतिशील लढवय्यात कसं झालं, हा प्रवास उलगडणारी -

एक झुंज गोंगाटाशी

डॉ. यशवंत ओक

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ४०)

# राजहंसी पार

काय घडलं
'राजहंसी' नगरीत?

## 'पत्र आणि मैत्र' व 'वाणी आणि लेखणी' पुस्तक प्रकाशन



डावीकडून : आनंद हर्डीकर, मंगला आठलेकर, सई परांजपे,
दिलीप माजगावकर, सदानंद मोरे, रेखा माजगावकर, प्रशांत दीक्षित,
विकास गायतोंडे, डॉ. सदानंद बोरसे, शिरीष सहस्रबुद्धे


'राजहंस प्रकाशना'चे सर्वेसर्वा दिलीप माजगावकर यांच्या सिद्धहस्त लेखणीतून उतरलेल्या 'पत्र आणि मैत्र' व 'वाणी आणि लेखणी' या दोन पुस्तकांचे एका छोटेखानी कार्यक्रमात दि. ११ नोव्हेंबर २०२३ रोजी प्रकाशन झाले.

राजहंसचे संपादक डॉ. सदानंद बोरसे यांनी उपस्थितांचे स्वागत केले, त्यानंतर ज्येष्ठ संपादक आनंद हर्डीकर यांनी दिलीप माजगावकर आणि राजहंस प्रकाशन यांच्याबरोबरचा आपला साहित्यिक प्रवास सांगितला. पुस्तक प्रकाशनानंतर दिलीप माजगावकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आभारप्रदर्शन संपादक शिरीष सहस्रबुद्धे यांनी केले.

गेली चाळीस वर्षे दिलीप माजगावकरांनी विविध नामवंतांशी 'या हृदयीचे त्या हृदयी' घातले असा केलेला चिंतनशील, भावगर्भ पत्रसंवाद; 'राजहंस'च्या वाटचालीचे विस्तृत सिंहावलोकन करणारी आणि त्या अनुषंगाने महाराष्ट्राच्या साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रपटाचा गेल्या पाऊण शतकाचा मागोवा घेणारी दिलीप माजगावकरांची प्रदीर्घ मुलाखत, तसेच 'दिगमा' या चतुरस्र अन् लोभस व्यक्तिमत्त्वाला न्याहाळणारे त्यांच्या सुहृदांचे लेख 'पत्र आणि मैत्र' या पुस्तकात आहेत.

दिलीप माजगावकरांनी विविध प्रसंगी प्रकाशनासंबंधी अनुभवसिद्ध मते मांडली आणि व्यवसायाच्या भवितव्याचा वेध घेतला. त्यांच्या वाणीने विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान व्यक्ती आणि साहित्यकृतींचा आस्थेवाईकपणे शोध घेतला. त्यांच्या अशा निवडक रसाळ भाषणांचे संकलन; तसेच त्यांनी अनेक सुहृदांची आंतरिक जिव्हाळ्याने आशयसंपन्न अशी व्यक्तिचित्रे लिहिली, त्यांतील बारा विलक्षण व्यक्तिचित्रे यांचा अंतर्भाव 'वाणी आणि लेखणी' या पुस्तकात आहे.

## 'किमयागार कार्व्हर' वाचकार्पण सोहळा




डावीकडून : रसिका राठिवडेकर, शिरीष सहस्त्रबुद्धे, स्वाती राजे,
अरविंद गुप्ता, वीणा गवाणकर, माधवी पुरंदरे, विनया देसाई

'अक्षरधारा बुक गॅलरी', 'राजहंस प्रकाशन' आणि 'मांडके हिअरिंग सर्व्हिसेस'तर्फे आयोजित ६००व्या दीपावली शब्दोत्सवानिमित्त ज्येष्ठ लेखिका वीणा गवाणकर यांनी खास किशोरवयीन मुलांसाठी लिहिलेल्या 'किमयागार कार्व्हर' या पुस्तकाचे वाचकार्पण ज्येष्ठ विज्ञान संशोधक आणि अभ्यासक अरविंद गुप्ता यांच्या हस्ते दि. १९ नोव्हेंबर २०२३ रोजी झाले.

'आपण रोजच्या जगण्यातील अस्सल आदर्शवाद मुलांसमोर मांडायला कमी पडतो आहोत. 'कार्व्हर' आपल्या अवतीभवतीही असतात, परंतु ते पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यात आपले प्रयत्न तोकडे पडत आहेत.' असे मत गुप्ता यांनी व्यक्त केले. 'कार्व्हर' हा माझाही हिरो आहे, असेही ते म्हणाले.

या प्रसंगी बालसाहित्यकार स्वाती राजे, बालसाहित्यकार आणि चित्रकार माधुरी पुरंदरे, लेखिका वीणा गवाणकर, अक्षरधारा बुक गॅलरीच्या संचालक रसिका राठिवडेकर, राजहंस प्रकाशनाचे संपादक शिरीष सहस्त्रबुद्धे आदी उपस्थित होते. या वेळी 'किमयागार कार्व्हर'चे इंग्रजी अभिवाचन ओम गवाणकर आणि मराठी

अभिवाचन अनन्या आठल्ये यांनी केले. माधुरी पुरंदरे, वीणा गवाणकर यांनी मुलांशी संवाद साधला.

## ‘काश्मिरियत’ पुस्तक प्रकाशन




‘काश्मिरियत’ पुस्तकाचे प्रकाशन करताना श्रीमती वसुंधरा जोशी

‘राजहंस प्रकाशन’ प्रकाशित आणि सुप्रिया राज लिखित ‘काश्मिरियत’ या पुस्तकाचे प्रकाशन १९ नोव्हेंबर २०२३रोजी ‘दादर माटुंगा कल्चरल सेंटर, मुंबई’ इथे झाले.

सर्व प्रसारमाध्यमांतून काश्मीरमधील परिस्थिती कशी धोकादायक आहे, अशा बातम्या प्रदर्शित होत असताना, एप्रिल २०१५मध्ये लेखिका सुप्रिया राज यांनी ठरवले की, ‘लाइन ऑफ कंट्रोल’ या भारत-पाकिस्तान यांच्यामधील सीमेवर स्वत: जाऊनच तिथला समाचार घ्यायचा. त्यांनी एकटीनं हा प्रवास केला. या प्रवासातील अडचणी, आव्हानेसुद्धा एखाद्याच्या कल्पनेबाहेरची आहेत. अशा वेळी लेखिकेच्या वाट्याला काय आले असेल, याची कहाणी म्हणजे हे पुस्तक आहे. त्यांच्याच शब्दात सांगायचे, तर ‘साहस, एकटेपण, अपमान, अश्रू, विस्मय आणि हे सगळे पदरी घेत पुढे जातच राहिले, त्यामुळे सर्वांत शेवटी सत्य अनुभवायची संधी मिळाली.’

डॉ. उदय निरगुडकर यांनी पुस्तकासाठी प्रस्तावना लिहिली आहे. त्यात ते लिहितात की, ‘हे पुस्तक वाचताना कुटुंब, नातेसंबंध, धर्म, देव, श्रद्धा, देश ह्या सर्व संकल्पना ढवळून निघतात आणि उरतो तो माणूसकीच्या शोधातला माणूस! एका अर्थानं हे पुस्तक बदलत्या स्त्रीचं चित्र आहे, यात स्त्रीपणाचा स्त्रीला (पुरुषाला नव्हे) अभिप्रेत असणारा अर्थ ठाशीवपणे समोर येतो. ह्या लेखनामुळे अनेक महिला एकल


प्रवासाला प्रवृत्त होतील.'

'काश्मीरमधले राजकारण आणि जातीयवाद ह्या विषयावरच्या एकूणच चर्चेत ज्यांना रस आहे आणि ज्यांनी त्या विषयाचे फार रवंथ करून आता चोथा झाला म्हणून तो विषय बाजूला ठेवला आहे, अशा दोन्ही प्रकारच्या लोकांना हे पुस्तक वाचून त्यातले स्वत:ला उपयोगी पडणारे सार तेवढे वेचून घेता येईल.' असे लेखिका आपल्या मनोगतात सांगतात.

हे पुस्तक प्रकाशित होण्याआधीच पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीची ७०% विक्री झाली. पुस्तक प्रकाशनाच्या दिवशी कौशल इनामदार यांनी मराठीतील कवींच्या कविता चालीत सादर केल्या, आश्विन चितळे यांनी उर्दू कविता सादर केल्या; तर लेखिका सुप्रिया राज यांनी पुस्तकातील निवडक भागांचे वाचन केले. याद्वारे या तिघांनी संपूर्ण पुस्तकाची रूपरेषा वाचकांसमोर उलगडून दाखवली.

प्रकाशनासाठी अनेक क्षेत्रांतील, विविध वयोगटांतील मंडळी उपस्थित होती.

## 'आर्थिक गुन्हेगारीचे अंतरंग' : अनौपचारिक प्रकाशन



डावीकडून : सुश्रुत कुलकर्णी, शिरीष सहस्रबुद्धे, दिलीप माजगावकर,
अपूर्वा जोशी आणि मयूर जोशी

'राजहंस प्रकाशन' प्रकाशित आणि अपूर्वा जोशी लिखित 'आर्थिक गुन्हेगारीचे अंतरंग' या पुस्तकाचे अनौपचारिक प्रकाशन दि. १० नोव्हेंबर २०२३ रोजी झाले.

प्रत्येकाच्या आयुष्यातला महत्त्वाचा भाग आर्थिक बाबींशी संबंधित असतो. कित्येक वर्षांच्या मेहनतीने मिळवलेली आपली कमाई एखाद्या आर्थिक घोटाळ्यामुळे

शून्यवत होऊ शकते. आजच्या ऑनलाईन जगतात सामान्य माणसालाही आर्थिक फसवणुकीला सामोरे जावे लागते. वेगवेगळे आर्थिक घोटाळे झाल्याचे सगळे जण वाचतात. मात्र ते नक्की कसे घडतात, कसे सापडतात त्यांचे सूत्रधार; हे लोकांना कळावे या उद्देशाने हे पुस्तक लिहिल्याचे लेखिका अपूर्वा जोशी त्यांच्या मनोगतात सांगतात.

## 'गाता रहे...' पुस्तक प्रकाशन



डावीकडून : सुहास किर्लोस्कर, दिलीप काळे, कौशल इनामदार, डॉ. सदानंद बोरसे

'राजहंस प्रकाशन' प्रकाशित आणि सुहास किर्लोस्कर लिखित 'गाता रहे...' या पुस्तकाचे प्रकाशन दि. ३ नोव्हेंबर २०२३ रोजी 'ज्योत्स्ना भोळे सभागृह, पुणे' येथे झाले. या वेळी प्रसिद्ध संगीतकार कौशल इनामदार व संतूरवादक दिलीप काळे उपस्थित होते.

सर्वप्रथम डॉ. सदानंद बोरसे यांनी प्रकाशकीय भूमिका मांडली. नंतर प्रमुख पाहुणे दिलीप काळे यांनी मनोगत मांडले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते कौशल इनामदार मनोगतात म्हणाले, ''शहाणे करूनी सोडावे सकळ जनांसी, याप्रमाणे आपल्याला जे माहीत आहे, ते इतरांना सांगण्याची ताकदही तुमच्यात असावी लागते; ती किर्लोस्कर यांच्याकडे आहे आणि त्यातूनच हे पुस्तक आकाराला आलंय.''

''संगीत जुने असो वा नवे, 'आपले' असो वा 'त्यांचे', शास्त्रीय-उपशास्त्रीय असो वा चित्रपटसंगीत; त्यातले बारकावे जाणून घेण्याच्या मधुकर वृत्तीने वारंवार ऐकत राहिलो, तर सुरुवात होते कानसेन रसिक होण्यास! नवी-जुनी गाणी ऐकताना त्यामधील उमजलेले बारकावे आस्वादकाच्या भूमिकेतून, वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून वाचकांसमोर मांडण्याचा प्रयत्न मी केलेला आहे.'' असे सुहास किर्लोस्कर आपल्या मनोगतात म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निशा किर्लोस्कर यांनी केले.

## 'आतून उगवलेल्या कविता' पुस्तक प्रकाशन




डावीकडून : ॲड. मिलिंद चिंधडे, प्रा. प्र. द. कुलकर्णी, डॉ. आशा कुलकर्णी, डॉ. वंदना बोकील-कुलकर्णी, डॉ. प्रतिभा जाधव, विवेक उगलमुगले, अभिषेक नासिककर, मेघा नासिककर

'राजहंस प्रकाशन' प्रकाशित आणि प्रा. प्र. द. कुलकर्णी लिखित 'आतून उगवलेल्या कविता' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन नाशिक येथील कुसुमाग्रज स्मारकातील 'विशाखा' सभागृहात दि. ५ नोव्हेंबर २०२३ रोजी झाले.

''सुमार साहित्याचे बेसुमार पीक आज मराठी साहित्यक्षेत्रात दिसत आहे. अशा काळात कसदार साहित्यनिर्मिती दुर्मीळ झाली असून, प्र. द. कुलकर्णी यांचा काव्यसंग्रह या कसदार साहित्यनिर्मितीचा एक उत्तम नमुना आहे.'' असे प्रतिपादन लेखिका वंदना बोकील-कुलकर्णी यांनी केले.

या वेळी बोलताना कवी विवेक उगलमुगले यांनी साधी-सोपी आणि परिणामकारक कविता हे या कवितासंग्रहाचे वैशिष्ट्य असल्याचे मत व्यक्त केले.

त्यानंतर साहित्यिक डॉ. प्रतिभा जाधव म्हणाल्या, ''सर्व काळात डोकावणाऱ्या अशा या कविता असून त्यातून कवीच्या माणूसपणाचा प्रत्यय येतो.'' या वेळी मनोगत व्यक्त करताना प्रा. प्र. द. कुलकर्णी यांनी १९६८ सालापासूनचा आपला कवितालेखनाचा प्रवास सांगितला. मित्रांसोबत रंगलेल्या काव्यमैफिलींच्या आठवणी जागवत त्यांनी या वेळी आपल्या अनेक मित्रांचा सत्कार केला.

मधुरा बेळे यांनी या काव्यसंग्रहातील दोन कविता सादर केल्या. ॲड. मिलिंद चिंधडे यांनी सूत्रसंचालन केले. आशा कुलकर्णी यांनी आभार मानले. अभिषेक कुलकर्णी, कांचन कुलकर्णी व अनेक मान्यवर उपस्थित होते.

# ‘आरोही - विशेष फूल फुलताना’ पुस्तक प्रकाशन



डावीकडून : डॉ. सदानंद बोरसे, किशोर पाटील, आरोही,
राजेश्वरी किशोर, रोहिणी देशपांडे

‘राजहंस प्रकाशन’ प्रकाशित आणि राजेश्वरी किशोर लिखित ‘आरोही : विशेष फूल फुलताना’ या पुस्तकाचे २८ ऑक्टोबर २०२३ रोजी पुण्यातील ‘वरदश्री सभागृहा’त प्रकाशन झाले.


आरोही एक दिव्यांग मुलगी असून जन्मतःच शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या असक्षम आहे. तिची आई म्हणजेच लेखिका नवऱ्याच्या सततच्या बदल्यांमुळे वेगवेगळ्या प्रांतांमध्ये मुलांसकट वास्तव्यास होती. तिथे आलेले सुखद आणि दुःखद अनुभव, विशेष मुलीचा स्वीकार करण्याचे आव्हान आणि परिस्थितीवर मात करून आनंदी राहण्याचा मंत्र लेखिकेने या पुस्तकातून दिला आहे.

विशेष मूल वाढवताना अडचणींचा कसा सामना करायचा आहे, याचे मार्गदर्शन या पुस्तकातून होते. सहज प्रवाही भाषा व कटुता न बाळगता तटस्थपणे केलेले अनभुवकथन आपल्याला पुस्तकाशी जोडून ठेवते.

‘हे पुस्तक वाचून समाजाचा दिव्यांगांकडे बघण्याचा दृष्टिकोन सकारात्मक झाला, तर तेच या पुस्तकाचे यश असेल.’ असे मनोगत लेखिकेने व्यक्त केले. डॉ. सदानंद बोरसे यांचे समयोचित भाषणही श्रोत्यांच्या पसंतीस उतरले. लेखिकेच्या ‘निकोबारची नवलाई’ या पहिल्या पुस्तकाला मिळालेल्या यशानंतर वाचकांकडून उंचावलेल्या अपेक्षा, हे पुस्तक नक्कीच पूर्ण करेल आणि वाचकांच्या पसंतीस उतरेल, असे मत अनेकांनी व्यक्त केले.

## ‘राजहंसी’ विविधा

ज्ञानाची क्षितिजे, नीतिमत्तेच्या चौकटी,
वैद्यकसत्ता अन् मानवी प्रवृत्ती या साऱ्यांचा वेध घेणारी
अमर्त्य पेशींची खरीखुरी कहाणी...





### ‘हेला’पेशी

कहाणी अमर्त्य पेशीची

वंदना अत्रे । शोभना भिडे

किंमत : ₹ १७०/- । (ट.ख. ₹ ४०)

पाणीव्यवस्थापनाच्या अद्ययावत राज्यनिहाय रचना
जोपासणाऱ्या शासकीय संस्थांना, औद्योगिक विश्वाला
व सर्वसाधारण नागरिकालाही मार्गदर्शक ठरेल
असे हे पुस्तक...




### पाण्या तुझा रंग कसा?

विद्यानंद रानडे

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ४०)

पृथ्वीच्या रंगमंचावर रंगले एक महानाट्य, साडेचार अब्ज
वर्षांपूर्वी. या महानाट्यातील आगळीवेगळी सजीव पात्रे
म्हणजे रेणूंचे अत्यंत सुसंघटित सहकारी संघ.
या पात्रांनी साकारलेले...




### उत्क्रांती : एक महानाट्य

माधव गाडगीळ

किंमत : ₹ ८००/- । (ट.ख. ₹ ६०)



# वाचकांच्या मनातलं...

*वाचकांचा प्रतिसाद हाच लेखकाचा खरा पुरस्कार! हा प्रतिसाद मित्रांना कळवा, तसेच आम्हांलाही कळवा; म्हणजे तो आम्ही लेखकांपर्यंत पोहोचवू. प्रकाशक-लेखक-वाचक यांच्यात विचारांची देवघेव करण्यासाठी.*

## आर्थिक गुन्हेगारीचे अंतरंग

'आर्थिक गुन्हेगारीचे अंतरंग' ह्या अतरंगी पुस्तकाने मन जिंकले. काही काही गोष्टी पडद्याआड राहतात. सामान्य माणसाला फक्त समोरचे चित्र दिसते, पण त्या चित्रामागे काय घडामोडी होतात ते कळत नाही. काही माणसे ह्या पडद्यावरील चित्राकडे बघून उलट गणिते करतात. काय कारणामुळे हे चित्र दिसत आहे, असेच का दिसत आहे, अजून कोणते घटक ह्या चित्राला मदत करत आहेत ह्याचा अभ्यास करून ती माणसे त्या चित्राच्या उगमापर्यंत जातात आणि त्यातले छोटे छोटे पापुद्रे उलगडतात. कोबीच्या गड्ड्यातून प्रत्येक पान वेगळे करून ते त्याकडे पाहू शकतात.

अशीच उलट गणिते करून आर्थिक गुन्हे उलगडणाऱ्या एका अज्ञात आर्थिक गुप्तहेराची कहाणी आपल्याला ह्या पुस्तकातून वाचायला मिळते. 'सत्यम' घोटाळ्याचा मुख्य आधार घेऊन त्या अनुषंगाने इतर घोटाळ्यांच्या गोष्टीही आपल्याला कळतात. अतिशय रंजक पद्धतीने अपूर्वा जोशी ह्यांनी सुश्रुत कुलकर्णी ह्यांच्या मदतीने हे पुस्तक लिहिले आहे. सत्यम घोटाळ्याचा तपास मयूर जोशी ह्या एका मराठमोळ्या माणसाने तडीस कसा नेला आणि त्याला प्रशासनाचे काय अनुभव आले, हे रंगतदार पद्धतीने आपल्यासमोर येते. मामला अतिशय संवेदनशील असल्याने किती लपवायचे आणि काय उघड करायचे, ह्याचा मेळ उत्तम साधला गेला आहे. त्यामुळे आर्थिक गुन्हेगार आणि त्या गुन्ह्यांचा शोध ह्यावर लेखिकेकडून अजून रंजक पुस्तकांची अपेक्षा मात्र वाढली आहे हेच खरे. मराठीत असे विषय जास्तीत जास्त आले, तर एक नवीन बोलीभाषा रूढ व्हायला मदतच होईल.

***विक्रम अवसरीकर***

## ‘राजहंसी’ विविधा




ज्ञानग्रहण आणि ज्ञानसंवर्धन मुक्तपणे होऊ शकेल, हे स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न म्हणजे ‘ओपन सोर्स’ चळवळ!
वेगाने विस्तारणाऱ्या या लोकचळवळीच्या
विविध पैलूंचा परामर्श घेणारी मनोज्ञ सफर!

### महाजालाचे मुक्तायन

अमृतांशु नेरुरकर

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ४०)


सामान्य माणसाची प्रयोगशाळा आहे ‘कट्टा’.
प्रत्येकाला सर्वकाळ आणि सर्वत्र उपलब्ध असलेली.
अशा ‘कट्टा’ प्रयोगशाळेतून विज्ञानक्षेत्र अधिक निकोप
आणि लोकाभिमुख करणारे -

### कट्टा मॉडेल

डॉ. मिलिंद वाटवे

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ४०)




वैद्यकीय व्यवसायाला ग्रासणाऱ्या
अनेक नवनिर्मित समस्यांवर सखोल विचार करणारे,
वैद्यकक्षेत्रातील जागल्याचे काम करणारे
एका प्रामाणिक डॉक्टराचे साक्षेपी चिंतन.

### आधुनिक वैद्यक : तथ्य आणि मिथ्य

डॉ. संजीव मंगरूळकर

किंमत : ₹ ३८०/- । (ट.ख. ₹ ४०)

# जग उजळवणारा शास्त्रज्ञ...

आज घरगुती आणि व्यावसायिक गोष्टींसाठी वापरण्यात येणारी वीज याची आपल्याला इतकी सवय झाली आहे की, विजेशिवाय आपले जीवन ही कल्पनाच आज आपल्याला सहन होणे शक्य नाही. पण ही रोजच्या आयुष्यात खेळवली गेलेली वीज शोधली कुणी? केव्हा? तिच्या निर्मितीमागे कोणत्या वैज्ञानिकांचा हात होता? घरगुती व व्यावसायिक गोष्टींसाठी आपण वापरतो ती वीज म्हणजेच 'प्रत्यावर्ती विद्युतधारा' जिला 'अल्टरनेटिंग करंट' (एसी करंट) असे आपण म्हणतो. विद्युतशक्तीबरोबर विद्युत चुंबकीय लहरीबद्दलचे तंत्रज्ञान विकसित करणारा हा थोर वैज्ञानिक होता निकोला टेस्ला. 'जी.एम.आर.टी.', खोडद या वेधशाळेत इलेक्ट्रॉनिक्स तंत्रज्ञ म्हणून कार्यरत असलेले सुधीर फाकटकर यांनी लिहिलेले 'निकोला टेस्ला' हे या वैज्ञानिकाचे चरित्र 'राजहंस प्रकाशन'कडून प्रकाशित झाले आहे.

निकोला टेस्लाचा जन्म ऑस्ट्रिया-हंगेरीमधील गॉस्पिकमध्ये झाला होता. त्याच्या जन्माची कथा ही एखाद्या सिनेमात शोभावी इतकी चित्तथरारक आहे. ती गोष्ट मूळ पुस्तकात वाचणेच योग्य होईल. आईचे नाव जॉर्जिना व वडील मिलुटीन. निकोला हा लहानपणापासूनच विज्ञान-तंत्रज्ञान याबद्दल कुतूहल असणारा मुलगा होता. निकोलावर आईचा प्रभाव जास्त दिसून येतो. आई जॉर्जिना ही निरक्षर पण हुशार होती. लोककाव्य सतत तिच्या मुखात असायचे. या गोष्टीचा निकोलाला फार फायदा झाला. त्याला संगीत आवडू लागले. निकोलाच्या कानावर पडणाऱ्या ह्याच काव्याचे तो हुबेहूब वर्णन करू लागला. त्यामुळे त्याला सादरीकरण उत्तम जमू लागले होते. आईमुळे निकोलाला कुठल्याही घटनेचे चित्र स्पष्ट करण्याची सवय चांगलीच विकसित होत होती, तर वडिलांमुळे त्याच्यावर चांगल्या वाचनाचे संस्कार घडत होते. निकोलाने विद्युत अभियांत्रिकीत आपले शिक्षण पूर्ण केले व कामाच्या शोधार्थ तो अमेरिकेत गेला. अमेरिकेत जाण्यासाठी करावा लागणारा संघर्ष हाही काही सोपा नव्हता.

न्यूयॉर्कला गेल्यावर त्याने थोर संशोधक तंत्रज्ञ थॉमस अल्वा एडिसन यांच्या कंपनीत विद्युत अभियंता म्हणून काम सुरू केले. अमेरिकेच्या न्यूयॉर्क शहरात जगातील पहिले विद्युत केंद्र उभारल्यानंतर अल्पावधीत युरोपात एडिसनच्या कंपनीचा विस्तार होत होता. मुख्यत्वे डायनामो प्रकारच्या जनरेटरमधून डीसी स्वरूपाच्या विद्युतदाबाचे तंत्रज्ञान प्रस्थापित होण्याचा तो कालखंड होता. दहा लाख लोकसंख्या असलेल्या न्यूयॉर्क शहराला सगळीकडे एडिसन कंपनीची विद्युतशक्ती होती. ही विद्युतशक्ती डीसी स्वरूपाची असल्यामुळे काही मर्यादा येत होत्या. डीसी विद्युतप्रवाहात निर्मिती झालेल्या ठिकाणापासून ते शेवटच्या ठिकाणापर्यंत विद्युतप्रवाह क्षीण होत जायचा. याचे कारण तारांमधून विद्युतप्रवाह वाहताना तारांचा प्रवाहाला

## ‘राजहंसी’ विविधा




गुणवंत माणसांच्या परीसस्पर्शानं आपल्या आयुष्याचं खऱ्या अर्थानं सोनं होतं!
स्वत:च्या झळाळत्या तेजानं बरोबरच्या आयुष्यांनाही लखलखवणाऱ्या व्यक्तिमत्त्वांची तेजाळ शब्दचित्रं.

### चंदेरी - सोनेरी

विलास शेळके

किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ४०)


२६/११ची काळरात्र.
मुंबईवर दहशतवाद्यांनी केलेला भीषण हल्ला.
चार वर्षांनी ऑपरेशन एक्स पूर्ण झालं.
या मोहिमेचा पडद्यामागच्या तपशिलांसह साद्यंत आढावा.


### ऑपरेशन एक्स

तुरुंग ते फाशीगेट : कसाबचा प्रवास

प्रज्ञा जांभेकर-चव्हाण

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ४०)




आपल्या प्रासादिक कलागुणांनी साहित्य, नाट्य, संगीत अन् सिनेमाचा परिसर उजळून काढणाऱ्या सात कलंदर व्यक्तिमत्त्वांना जाणून घेण्यासाठी वाचा...

### शुभ्र काही जीवघेणे

अंबरीश मिश्र

आवृत्ती सहावी । किंमत : ₹ १७५/- । (ट.ख. ₹ ४०)

होणारा विरोध. त्याच वेळी टेस्लाने प्रत्यावर्ती धारा म्हणजेच एसी करंट यात संशोधन केले. या प्रत्यावर्ती धारेला दूर अंतरापर्यंत वाहून नेता येते, तर डीसी प्रवाह अंतर वाढले की कमी होत जातो. इथेच टेस्ला व एडिसन यांच्यात वादाची ठिणगी पडली. हा ‘करंट वॉर’, त्याचा परिणाम हे पुस्तकात मुळातूनच वाचणे योग्य ठरेल. निकोलावर उत्तर आयुष्यात कर्जबाजारी होण्याची नामुष्की आली. त्याच्या विद्युत चुंबकीय संदेशवहनाला त्यावेळच्या शास्त्रीय वर्गाने म्हणावी तशी साथ दिली नाही. उलट निकोलाच्या व जगदीश चंद्र बसूंच्या विद्युत चुंबक संदेशवहनावरील संशोधनाचा वापर करून मार्कोनीने रेडिओलहरी तयार केल्या. मात्र मार्कोनीने रेडिओलहरींचे पेटंट इटलीतून घेतल्यामुळे टेस्लाला त्याच्याविरुद्धचा खटला अमेरिकेत चालवता येईना.

स्वामी विवेकानंद जेव्हा अमेरिकेत धर्मपरिषदेसाठी गेले होते, तेव्हा त्यांच्या विचारांचा टेस्लावर चांगलाच प्रभाव पडला. विवेकानंदांच्या मृत्यूची बातमी ऐकून टेस्ला खूप हळहळलासुद्धा होता. विद्युतनिर्मितीची आजची सुलभ पद्धत शोधण्याचे श्रेय निर्विवादपणे निकोला टेस्लालाच जाते. काळाच्या पुढे पाहणाऱ्यांची ही अशी उपेक्षा व्हावी? विद्युतचुंबकीय जनित्र, विद्युत चुंबकीय संदेशवहन संशोधनात मोलाची भर घालणारा टेस्ला होता. आपले अवघे आयुष्य विद्युत तंत्रज्ञानात झोकून देण्याऱ्या या मनस्वी वैज्ञानिकाच्या विलक्षण आयुष्याचा वेध म्हणजेच ‘निकोला टेस्ला’ हे पुस्तक होय.


***अजिंक्य कुलकर्णी***


अनेक प्रकारे उपयुक्त ठरणारी वीज सामान्य माणसाच्या
दैनंदिन आयुष्यात खेळवणाऱ्या -
आपले अवघे आयुष्य विद्युतविज्ञानात झोकून देणाऱ्या -
मनस्वी वैज्ञानिकाच्या विलक्षण आयुष्याचा वेध!


निकोला टेस्ला
रोजच्या आयुष्यात वीज खेळवणारा वैज्ञानिक

सुधीर फाकटकर

किंमत : ₹ २७०/- । (ट.ख. ₹ ४०)



# ‘राजहंसी’ विविधा




१८९८ ते १९०८ हा लोकमान्यांचा राजकीय कर्तृत्वाचा माध्यान्हकाळ! आधी ते नामदार टिळक होते, नंतर ते ‘लोकमान्य’ झाले.
याच त्यांच्या लोकमान्यत्वाच्या पैलूंचा वेध!

## अष्टावधानी लोकमान्य

अरविंद व्यं. गोखले

किंमत : ₹ २७५/- । (ट.ख. ₹ ४०)

नोकरी मागणारा नव्हे, तर अनेकांना नोकरी देणारा तरुण उद्योजक. विकासाचा वसा घेतलेल्या हणमंतराव गायकवाडांची अन् ‘भारत विकास ग्रुप’ची कहाणी!

## असाही एक किमयागार

अंजली ठाकूर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ २७५/- । (ट.ख. ₹ ४०)






ही कहाणी केवळ आकाशात भरारी घेणारा वैमानिक कायमसाठी चाकाच्या खुर्चीत जखडबंद होतो त्याची नाही, तर पुनश्च ‘राखेतून उगवतीकडे’ निग्रहाने झेपावतो, त्याची आहे.

## राखेतून उगवतीकडे

विंग कमांडर अशोक लिमये

अनुवाद : सोनाली नवांगुळ

किंमत : ₹ ३२५/- । (ट.ख. ₹ ४०)

# अलवार मनाची हुरहुर

सप्रेम नमस्कार.

'अलवार मनाची हुरहुर' ही श्री. राजीव शास्त्री ह्यांची कादंबरी वाचली. ती महाराष्ट्रातील नामांकित 'राजहंस प्रकाशना'ने प्रकाशित केली आहे.

सदर कादंबरीचा नायक श्री. विनायक कुलकर्णी एका मध्यमवर्गीय ब्राह्मण कुटुंबात वाढलेला साधा-सरळ माणूस. आयुष्यात रूढ अर्थाने यशस्वी होऊनही त्याला लागलेली हुरहुर कादंबरीत अतिशय चांगल्या पद्धतीने व्यक्त झाली आहे.

भौतिक सुखाच्या मागे लागून झालेला नैतिकतेचा ऱ्हास आणि असलेले संस्कार ह्या चक्रव्यूहात सापडून नायकाची झालेली अवस्था, भ्रष्टाचाराच्या दलदलीत फसलेली सामाजिक परिस्थिती; तर दुसरीकडे मनाची मशागत करणाऱ्या मूल्यांबद्दलची ओढ कादंबरीत आवर्जून दिसते. व्यवसाय करताना इच्छा नसूनसुद्धा भ्रष्टाचाराच्या भस्मासुराला कसे सामोरे जावे लागते, ह्याचे ज्वलंत उदाहरण लेखकाने अतिशय सुंदरपणे वाचकासमोर मांडले आहे.

कादंबरीची साधी, सोपी मांडणी वाचकाला योग्य तो संदेश देण्यात यशस्वी झाली आहे. मुखपृष्ठ विषयाला साजेसे व सुंदर रेखाटले आहे. अतिशय वाजवी किंमत असलेली कादंबरी, भारत आणि भारताबाहेरही मराठी वाचकांना आपल्या संग्रही ठेवण्यास जरूर आवडेल.

***अरुण कोंढरा***
ऑस्टीन, टेक्सास, अमेरिका

एक मध्यमवर्गीय मुलगा परिस्थितीशी झगडत शिकून बांधकाम व्यावसायिक होतो. खाजगीकरण, उदारीकरण अन् जागतिकीकरण यांच्यामुळे त्याच्या आयुष्यात होते उलथापालथ. एका संवेदनशील माणसाच्या आयुष्याची वेधक कहाणी.

अलवार मनाची हुरहुर
राजीव शास्त्री
किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ४०)



# ‘मिरॅकल’

‘मिरॅकल’ हे डॉ. सुनिल विभुते सरांनी लिहिलेले सुंदर पुस्तक मी वाचले. वाचले आणि काही काही प्रसंगांमध्ये अगदी रममाण होऊन गेले. पुस्तक वाचताना त्यामधील एक-एक कथा वाचकाला खिळवून ठेवतात. त्यातील प्रसंग इतके अचूकतेने लिहिले आहेत की, लहान लहान गोष्टीसुद्धा त्यांच्या नजरेतून सुटल्या नाहीत. काश्मीरचे वर्णन असो की बसचा अपघात झाल्यानंतर त्यामध्ये मरण आलेल्या पुण्याच्या अपार्टमेंटमधील सर्व पुरुषमंडळी, त्यांच्या सर्व वीरपत्नींचा पतीच्या मृत्यूला जबाबदार दहशतवाद्यांना धडा शिकवण्यासाठीच खडतर पण अभिमानास्पद प्रवास, व सर्वांना दिलेली शिक्षा असो; याचे वर्णन अप्रतिमच. ‘राकेश करणी’ ही कथा वाचल्यावर मलाही जंगलात जाऊन त्या दुर्मीळ झाडांची फळे पाहायला खरेच आवडेल, असे वाटले. ती झाडे आपल्या भारतातील जंगलात आत्ताही असावीत.

‘फल्सोबो’ वाचताना डॉ. विभुते सरांची वैज्ञानिक भाषाशैली खूपच छान आहे. ही





इटलीच्या स्टुडिओनं आणि लंडनच्या जाहिरात कंपनीनं सन्मानानं बोलावून घेतलेला भारतीय डिझायनर. त्यांनी ग्राफिक डिझाइनला भारतीय चेहरा देण्याचा ध्यास घेतला.

रॉबी डिसिल्वा

एका मनस्वी कलाकाराचा प्रवास

वीणा गवाणकर

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ २४०/- । (ट.ख. ₹ ४०)



आजच्या विज्ञानाच्या पायावर भविष्यातील विज्ञानकल्पनेचा महाल उभारणाऱ्या - मानवी भावभावनांचा, परस्परसंबंधांचा वेध घेणाऱ्या - उत्कंठावर्धक, चित्तथरारक अन् रंजक विज्ञानकथांचं सप्तरंगी इंद्रधनुष्य!

मिरॅकल

डॉ. सुनील विभुते

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ४०)



कथा हॉलिवूड चित्रपट पाहत आहोत, अशा सुंदर पद्धतीने रेखाटली आहे. 'कार्डिओ' या कथेतील बापू वाचकांच्या दीर्घ काळ मनावर कोरले जातील इतके डॉ. विभुते सरांचे शब्द ताकदवान आहेत व तेवढेच हळवेदेखील. इन्स्पेक्टर रुद्रप्रताप यांचे वर्णन कडवा पोलीस इन्स्पेक्टर, त्याची कर्तव्यदक्षता व पराक्रम यांना लेखकाने त्याच्या शब्दांतून योग्य न्याय दिलेला दिसून येतो. 'मिरॅकल' कथा वाचून असेही मिरॅकल होऊ शकते, असेच वाटू लागते. 'गुरूमहाराज' ही कथा संपेपर्यंत हुबेहूब माणसासारखे दिसणारे यंत्रमानव आहेत, हे समजत नाही. डॉ. विभुते यांची लेखनशैली खूपच वास्तववादी आहे, वाचकाला भुरळ पाडणारी आहे आणि समजायला सोपी अशी आहे. त्यामुळे बऱ्याच दिवसांनी असे पुस्तक मिळाले की हातातून सोडावे असे वाटले नाही.

***सुवर्णा कुलकर्णी,*** पंढरपूर

### मुखपृष्ठ व मलपृष्ठ यांवरील पुस्तकांविषयी

- पत्र आणि मैत्र — किंमत : ₹ ५००/-
  दिलीप माजगावकर
- वाणी आणि लेखणी — किंमत : ₹ ५००/-
  दिलीप माजगावकर
- डोईचा पदर आला खांद्यावरी... — किंमत : ₹ २८०/-
  डॉ. छाया महाजन
- शब्द सूर जपून ठेव... — किंमत : ₹ ३००/-
  नेहा लिमये
- गाता रहे... — किंमत : ₹ ५००/-
  सुहास किर्लोस्कर
- हिरवी पोर्ट्रेट्स — किंमत : ₹ २८०/-
  पुरुषोत्तम बेर्डे
- संधिप्रकाश — किंमत : ₹ ३००/-
  ज्योत्स्ना विद्याधर लेले
- खांदे सुजलेले दिवस — किंमत : ₹ २००/-
  अशोक कोतवाल

## ‘राजहंस बुक क्लब’ योजना नव्या आकर्षक स्वरूपात !

| कोणतेही १ पुस्तक | कोणतीही २ पुस्तकं | कोणतीही ३ पुस्तकं |
| --- | --- | --- |
| ५०% सवलतीत | ५०% सवलतीत | ५०% सवलतीत |
| २००रु. १ वर्ष | ३५०रु. २ वर्षं | ५००रु. ३ वर्षं |

आणि सभासदत्वाच्या मुदतीत राजहंसची सर्व पुस्तकं २५% सवलतीत! वर्गणीच्या मुदतीत ‘राजहंस ग्रंथवेध’ मासिक सप्रेम भेट

Download on the App Store

आयफोन आणि आयपॅडसाठी

आमच्या नवनवीन योजनांसाठी ‘राजहंस ॲप’ बघत राहा.

GET IT ON Google Play

अँड्रॉइड फोन आणि टॅब्लेटसाठी

## राजहंस प्रकाशन

- १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. ✆ २४४६५०६३/२४४७३४५९.
  E-mail : rajhansprakashan1@gmail.com | Website : www.rajhansprakashan.com
- राजहंस पुस्तक पेठ, साई सरस्वती, शिक्षकनगर, गल्ली क्र. ७च्या सुरुवातीस, परमहंसनगर, वनाजजवळ, पौड रोड, पुणे ४११०३८. ✆ ९३२२६३०७०३.
- शॉप नं. २, सखारामकृपा अपार्टमेंट, अमर हिंद मंडळासमोर, गोखले रोड, दादर (प.), मुंबई ४०००२८. ✆ २४२२३९०१.
- नरेश सबजीवाले, गुलमोहर हॉलसमोर, खामला रोड, नागपूर ४४००२५. ✆ ९३७२२२५२०१.
- शुभांगी देशपांडे, १०, शून्य संकुल, सहजीवन कॉलनी, समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर ४३१००१. ✆ ९०९६९४३३६९.
- पंकज क्षेमकल्याणी, २, तळमजला, गुरुपुष्य अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्रामागे, आनंद नगर, (सावरकर नगर), गंगापूर रोड, नाशिक - ४२२०१३. ✆ ९४२२२५२२०८
- अक्षरदालन, निर्मलाय प्लाझा, कोळेकर तिकटी, कोल्हापूर ४१६०१२. ✆ २६४६४२४.
- डॉ. उमेश करंबेळकर, ३२५ मंगळवार पेठ, रघुकुल अपार्टमेंट, सातारा ४१५००२. ✆ २८२५१०.
- मुग्धा शेवाळकर, तळमजला, साईदत्त अपार्टमेंट, सितारा बजाज शोरूमजवळ, शांतीनगर, फोंडा, गोवा ४०३४०१. ✆ ७३९७४६९३९० / ८६०५८९१०१९





हा ललित लेखसंग्रह म्हणजे कोकणच्या अंत:स्पंदनांची रम्य स्मरणयात्रा.

बेर्डेंमधला लेखक - दिग्दर्शक - चित्रकार - नेपथ्यकार - पार्श्वसंगीतकार - जाहिरात कलाकार - वाद्यवृंदकार कसा घडत गेला, नावारूपाला आला याची ही प्रेरणादायक कहाणी.

**हिरवी पोर्ट्रेट्स**
पुरुषोत्तम बेर्डे

अलीकडे अनेक तरुण-तरुणी अमेरिकेत स्थायिक झालीत. निरनिराळ्या कारणांनी तिथे गेलेले त्यांचे पालक अगदी वेगळ्या जीवनशैलीला सामोरे जातात. सहयोग, सहवास, सहजीवनाने त्यांचा आनंद द्विगुणित होतो. सुखदु:खाच्या हिंदोळ्यावर झुलणाऱ्या प्रेमी युगुलांची कहाणी सांगणारी ही अनोखी कादंबरी.

**संधिप्रकाश**
ज्योत्स्ना विद्याधर लेले







भयकंपित करणारे बदल अन् बाजारीकरणातून निर्माण झालेल्या शोषणाच्या नवनव्या तऱ्हांनी बरबटलेला जडशीळ भोवताल पेलता पेलता घायाळ झालेला समकाळ म्हणजे 'खांदे सुजलेले दिवस' हा कवितासंग्रह.

**खांदे सुजलेले दिवस**
अशोक कोतवाल

Registered
Rajhans Granthavedh
(REGD.NO. : PCW / 133 / 2022-2024 RNI NO. MAHMAR / 2009 / 33647)
Published on 15th of every month and posted on 20th of every month at S.P.COLLEGE PO,Pune)
Licence to post without Pre-payment No. - WPP-48

सीतेकडे बघायचा एक नवाच दृष्टिकोन घेऊन येत आहे -

**अभिराम भडकमकर**
यांची नवी कादंबरी

# सीता

अगदी लवकरच...

प्रेषक : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा : राजहंस प्रकाशन.** १०२५, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. फोन : २४४७३४५९

**सदरचे मासिक 'राजहंस' प्रकाशनाच्या वतीने मुद्रक, प्रकाशक रेखा दिलीप माजगावकर यांनी रिच प्रिंट्स, २७२ नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : डॉ. सदानंद बोरसे**